७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. ०४ मार्च २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## विशाखा सुभेदारचा मुलगा कुवैतमध्ये अडकला

मुंबई (दै. संध्या) : इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धामुळे हजारो भारतीय नागरीक आखाती देशांत अडकले आहेत. या लोकांना मायदेशी आणण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. मराठी हास्य अभिनेत्री विशाखा सुभेदार यांचा लंडनला जाणारा मुलगाही या युद्धामुळे कुवैतमध्ये अडकला आहे. त्याच्या सुटकेसाठी विशाखा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना साकडे घातले आहे. यावेळी त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते.विशाखा सुभेदार यांनी एका पोस्टमध्ये म्हटले आहे की, माझी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनंती आहे की, माझा मुलगा अभिनय लंडनच्या प्रवासाला निघाला होता. पण सध्या तो कुवैतमध्ये अडकला आहे. गेली 4 दिवस एअरस्पेस नसल्यामुळे तो तिथे अडकून पडला आहे. आता तेथील परिस्थिती गंभीर होत आहे. आपण हे बातम्यांमध्ये पाहत आहोत. तो स्वतः तिथे ते अनुभवत आहे. तिथे ड्रोन हल्लेही होत आहेत.

### ढिंग-टांग




# नरेंद्र मोदींनी फिरवला फोन

## आखाती देशातील दोन बड्या नेत्यांशी चर्चा, युद्धजन्य परिस्थितीवर चर्चा

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

अमेरिका, इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील संघर्ष थेट युद्धजन्य परिस्थितीवर येऊन पोहोचला आहे. त्याच पार्श्वभूमीवर इराण आणि आखाती भागातील देशांमध्ये लढाऊ विमानांचे हल्ले आणि स्फोट झाल्याचं पाहायला मिळत आहे. दोन्ही देशांतील संघर्ष तीव्र होत असताना भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे. रमजानच्या पवित्र महिन्यात आखाती भागातील संघर्ष वाढणे हे दुर्दैवी असल्याचं भारताने स्पष्ट केलं. या संघर्षात अनेक लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे आणि त्याबद्दल भारताने तीव्र शोक व्यक्त केला. तर, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आखाती देशातील दोन प्रमुख नेत्यांशी फोनवरुन संवाद साधला. ओमान आणि कुवेतमधील प्रमुखांना फोन करुन



तेथील परिस्थितीची महिती घेतली.

आखाती देशांत लाखो भारतीय नागरिक वास्तव्यास असून अनेक भारतीय पर्यटकही सद्यस्थितीत तेथे अडकले आहेत. त्यामुळे, येथील बदलत्या परिस्थितीवर भारत सरकार सातत्याने लक्ष ठेवून आहे. राष्ट्रीय हित लक्षात घेऊन आवश्यक ते निर्णय घेत राहील, असेही भारताकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. त्यातच, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने दोन महत्त्वाच्या नेत्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधला. मोदींनी ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक आणि कुवेतचे युवराज शेख सबाह अल-खालिद अल-हमद अल-मुबारक अल-सबह यांच्याशी फोनवरुन चर्चा केली. आखाती देशात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीवर आणि येथील भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसंदर्भातही चर्चा केल्याची प्राथमिक माहिती आहे. नरेंद्र मोदींनी या दोन्ही नेत्यांसोबत चर्चा करताना संबंधित देशांतील हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त केली. तसेच त्या देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या अनिवासी भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत आणि स्थलांतरणासंदर्भातही त्यांनी सविस्तर चर्चा केली.

आखाती भागात सुमारे एक कोटी भारतीय नागरिक वास्तव्यास असून तेथे काम करतात. त्यांच्या सुरक्षेला आणि कल्याणासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं. या प्रदेशातील कोणत्याही नकारात्मक घडामोडींचा परिणाम भारतावर होऊ शकतो, याचीही चिंता केंद्र सरकारने व्यक्त केली. संघर्षग्रस्त देशांतील भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावास नागरिकांशी सातत्याने संपर्कात असून आवश्यकतेनुसार मार्गदर्शक सूचना जारी करत आहेत.

## खामेनींच्या हत्येवर दिल्लीचे मौन आश्चर्यकारक : सोनिया गांधी

**नवी दिल्ली (दै. संध्या)**



काँग्रेसच्या राज्यसभा खासदार सोनिया गांधी यांनी इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्या मृत्यूवर भारत सरकारच्या शांततेबद्दल तीव्र प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी म्हटले - ही शांतता तटस्थता नाही, तर जबाबदारीपासून पळ काढणे आहे. सोनिया गांधींचा संपादकीय लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांनी लिहिले - 1 मार्च रोजी इराणने पुष्टी केली की त्यांचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांची एक दिवसापूर्वी अमेरिका आणि इस्रायलच्या लक्ष्यित हल्ल्यात हत्या करण्यात आली. सध्या सुरू असलेल्या राजनैतिक चर्चेदरम्यान कोणत्याही विद्यमान राष्ट्राध्यक्षाची हत्या समकालीन आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये गंभीर दुरावा आहे. सोनिया गांधींनी लिहिले आहे की ही घटना जितकी धक्कादायक आहे, त्याहून अधिक धक्कादायक नवी दिल्लीची शांतता आहे. भारत सरकारने ना हत्येचा निषेध केला आणि ना इराणच्या सार्वभौमत्वाच्या उल्लंघनावर कोणतीही स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेस खासदारांनी लिहिले की, पंतप्रधान मोदींनी सुरुवातीच्या निवेदनात अमेरिका-इस्रायलच्या मोठ्या हल्ल्याकडे दुर्लक्ष करत केवळ यूएईवरील इराणच्या प्रत्युत्तरादाखल कारवाईचा निषेध केला. नंतर त्यांनी 'गहरी चिंता' आणि 'संवाद व मुत्सद्देगिरी' याबद्दल बोलले, तर हल्ला त्याच वेळी झाला जेव्हा मुत्सद्देगिरीची प्रक्रिया सुरू होती.

ही हत्या कोणत्याही औपचारिक युद्धाची घोषणा न करता आणि चर्चा प्रक्रिया सुरू असताना करण्यात आली. संयुक्त राष्ट्र चार्टरच्या कलम 2(4) नुसार, कोणत्याही देशाच्या सीमा किंवा त्याच्या राजकीय स्वातंत्र्याविरुद्ध बळाचा वापर करणे किंवा धमकी देणे चुकीचे आहे. एखाद्या विद्यमान राष्ट्राध्यक्षाची लक्ष्यित हत्या (टार्गेट किलिंग) या नियमांच्या विरोधात आहे.

### ब्रेकिंग न्यूज

## मनोज जरांगेंचे धनंजय मुंडे समर्थकाला प्रत्युत्तर

सोलापूर (दै. संध्या) : "माझा समाज आणि माझे कुटुंब मी डावावर लावले आहे. कुणी भाळी भंडारा लावून मारण्याच्या धमक्या देत असेल, तर मी त्याला घाबरत नाही. उलट, माझ्या वाट्याला येणाऱ्यांची सुपारी मीच फोडीन," अशा शब्दांत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे समर्थक गोविंद फड यांना तडाखेबंद प्रत्युत्तर दिले. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गेल्या आठवड्यात गोविंद फड यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत जरांगे पाटील यांना थेट इशारा दिला होता. धनुभाऊंच्या केसाला जरी धक्का लागला, तर खेळ खल्लास... असे पोस्टमध्ये म्हटले होते. आता या इशाऱ्याचा समाचार घेताना जरांगे यांनी मुंडे समर्थकांसह विरोधकांवर कडाडून टीका केली. जरांगे पाटील म्हणाले की, "तू कोणत्याही गावात ये, महाराष्ट्रातील प्रत्येक कोपऱ्यात माझा मराठा समाज उभा आहे. धमक्या देण्यापेक्षा समोर या, आम्ही लढायला समर्थ आहोत. मी माझ्या समाजाला मायबाप मानले आहे, त्यांच्यासाठी रात्रंदिवस बाहेर आहे. गरिबांची कामे करतो म्हणून मला मारणार असाल, तर माझी मरणाची कधीही तयारी आहे." केवळ आरक्षणावर न थांबता मनोज जरांगे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही भाष्य केले. "शेतकरी म्हणून एकजुटीने आंदोलनात उतरा. मी शब्द देतो, तुमचे कर्ज थकवून ठेवणार नाही. तुमच्या मालाला भाव कसा मिळत नाही, पीक विम्याचे पैसे कसे मिळत नाहीत आणि दुधाला दर कसा मिळत नाही, तेच आता मी बघतो. फक्त एकदा 'बस' म्हणलं की उठायचं नाही, ही चिकाटी ठेवा," असे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले.

## न्याय मिळाला म्हणून इतरांना हिणवू नका; हा षडयंत्राचा काळ

**मुंबई (दै. संध्या)**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी कृषी खात्यातील कथित घोटाळ्याप्रकरणी दिलासा मिळाल्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्यावर टीका करणाऱ्या आपल्या समर्थकांना खडेबोल सुनावलेत. न्याय मिळाला म्हणून इतरांना हिणवू नका. हा षडयंत्राचा काळ आहे, असे ते म्हणालेत. मुंबई उच्च न्यायालयने धनंजय मुंडे यांना 2024 च्या कृषी विभागाच्या खरेदी - विक्री व्यवहाराशी संबंधित एका प्रकरणात क्लीनचिट दिली होती. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या क्लीनचिटला लोकायुक्तांकडे आव्हान दिले होते. लोकायुक्तांनीही सोमवारी मुंडे यांना दिलासा देत दमानिया यांची तक्रार धुडकावून लावली आहे. आम्ही मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात कोणताही निर्णय देऊ शकत नाही, असे म्हणत लोकायुक्तांनी हे प्रकरण निकाली काढले. यामुळे धनंजय मुंडे यांना मोठा दिलासा मिळाला. त्यानंतर त्यांच्या समर्थकांनी अंजली दमानिया यांना ट्रोल करण्यास सुरुवात केली. धनंजय मुंडे यांच्या समर्थकांनी यासंबंधी केलेल्या अनेक पोस्ट अंजली दमानिया यांनी सार्वजनिक केल्या. त्यावर संमिश्र प्रतिक्रिया आल्या. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी आपल्या



■ धनंजय मुंडे यांचे दमानियांना हिनवणाऱ्या आपल्याच समर्थकांना खडेबोल

समर्थकांचे कान टोचलेत. ते मंगळवारी या प्रकरणी एका पोस्टद्वारे म्हणाले, प्रत्येकाला आपल्या उद्दिष्ट आणि हेतूप्रमाणे कृती करण्याचा अधिकार आहे. आपण आपल्या परीने न्याय-दाद मागण्याच्या प्रक्रियेतून जात आहोत. अश्या परिस्थितीत आपल्याला न्याय मिळाला म्हणून कोणीही इतरांना हिणवू नये. हा षडयंत्रांचा काळ आहे. आपल्यापैकी अनेकांच्या अश्या भावनिक व अविचारी कृतीमुळे आपल्याविरुद्ध षडयंत्र करणाऱ्यांना अधिक बळ मिळते, हे लक्षात घ्या. शेवटी संयम सर्वात महत्त्वाचा, असे ते म्हणालेत.

महाराष्ट्र कृषी विभागामार्फत पाच प्रकारच्या कृषी साहित्य व खतांची खरेदी बाजारभावाच्या जवळपास दुप्पट दराने आणि अत्यंत मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला होता.

# आखाती देशांत मराठी नागरिक अडकले

## मुख्यमंत्री फडणवीस विविध यंत्रणांच्या संपर्कात; एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवारांचेही विशेष प्रयत्न

**मुंबई (दै. संध्या)**

इराण विरुद्ध अमेरिका - इस्त्रायल युद्धामुळे आखाती देशांत अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना मायदेशी आणण्यासाठी राज्य सरकार सक्रिय झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रकरणी विविध यंत्रणांच्या संपर्कात आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांनीही या प्रकरणी आपल्या पातळीवर विशेष प्रयत्न सुरू केलेत.

आखातात इराण विरुद्ध अमेरिका इस्त्रायल युद्धाचा भडका उडाला आहे. यामुळे भारताचे हजारो नागरीक आखातात अडकून पडले आहेत. या नागरिकांनी सरकारकडे मदतीची याचना केली आहे. त्यानुसार, सरकार त्यांना मायदेशी आणण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. ते या प्रकरणी विविध यंत्रणांशी सातत्याने संवाद साधत आहेत. त्यांनी या प्रकरणी मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे समन्वयाची जबाबदारी सोपवली आहे. मदतीची गरज असलेल्या नागरिकांसाठी राज्य सरकारने +97150 365 4357 हा विशेष व्हॉट्सएप क्रमांकही जारी केला आहे. गरजू नागरिकांना या क्रमांकावर संवाद साधता येईल.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाने या प्रकरणी म्हटले आहे की, आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्ध परिस्थितीमुळे तिथे अडकलेल्या महाराष्ट्रातील विविध नागरिकांच्या संपर्कात राज्य सरकार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः सातत्याने विविध यंत्रणांशी संपर्कात असून, ते केंद्र सरकारसोबत सुद्धा सातत्याने संपर्क ठेवून आहेत.राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांना त्यांनी समन्वय कार्यात लक्ष घालण्यास सांगितले आहे.

केंद्र सरकार सुद्धा सर्वतोपरी मदत महाराष्ट्र सरकारला करीत आहे. दुबईतील इंडियन पीपल्स फोरमच्या सोबत समन्वय साधून महाराष्ट्र सरकारने एक व्हॉटसॲप क्रमांक जारी केला असून ज्यांना मदतीची गरज आहे, त्यांनी या व्हॉटसॲप क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे. व्हॉटसॲप क्रमांक : +97150 365 4357

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही दुबईसह यूएईत अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या मदतीसाठी तातडीने पाऊले उचलली आहेत. त्यांनी या प्रकरणी तिथे अडकलेल्या नागरिकांशी व्यक्तिशः संवाद साधून त्यांच्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था केली. त्यानुसार, स्टार एअरची दोन विशेष विमाने आज दुपारी फुजैरा एअरपोर्टवरून उड्डाण घेणार आहेत.

VTGSO – हे विमान दुपारी 3.30 वाजता, तर VT GSH – सायंकाळी 4.30 वाजता टेकऑफ घेणार आहेत. या दोन्ही विमानांमधून एकूण 164 प्रवाशी आज सायंकाळी मुंबई विमानतळावर दाखल होणार आहेत. यात पुण्यातील इंदिरा स्कूल ऑफ बिझनेस स्टडीजचे 84 विद्यार्थी तसेच ठाणे, मुरबाड, अहिल्यानगर आदी भागातील नागरिकांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 2 दिवसांपूर्वीच या मराठी नागरिकांशी संवाद साधला होता. तुम्ही सर्वजण सुरक्षित आहात. काळजी करू नका.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही आखातात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुटकेसाठी सरकार सर्वोतपरी प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांनी या प्रकरणी एक विशेष व्हॉट्सअ‍ॅप हेल्पलाईन क्रमांकही जारी केला आहे. त्या आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या, आखाती प्रदेशातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तिथे अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांची सुरक्षितता ही प्राधान्यक्रमाने राज्य सरकारसाठी सर्वोतोपरी आहे. संबंधित यंत्रणांमार्फत सर्व नागरिकांशी सातत्याने संपर्क साधला जात असून, त्यांना आवश्यक ती मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

# पुरंदरच्या ग्रामीण विकासाचा झंझावात : ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्याकडून गुरोळी आणि आडाचीवाडीच्या कार्याचा गौरव

**नाझरे सुपे (दै. संध्या)**

ग्रामस्थांकडून बैलगाडीतून भव्य मिरवणूक, श्रमदान, पर्यावरण आणि आधुनिक शिक्षणाचे मंत्र्यांकडून कौतुक प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी फौज उपस्थित"ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलण्यासाठी केवळ शासकीय निधी पुरेसा नाही, तर त्याला लोकसहभागाची जोड मिळणे आवश्यक आहे. पुरंदर तालुक्यातील गुरोळी आणि आडाचीवाडी या गावांनी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना'च्या माध्यमातून जे काम उभे केले आहे, ते राज्यासाठी पथदर्शक आहे. विकासाचा हा 'पुरंदर पॅटर्न' भविष्यात संपूर्ण महाराष्ट्रात राबवला जाईल," असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री नामदार श्री. जयकुमार गोरे साहेब यांनी केले.

दिनांक २ मार्च २०२६ रोजी मंत्री महोदयांनी या दोन्ही गावांना सदिच्छा भेट देऊन दिवसभर विविध




विकासकामांचे लोकार्पण, पाहणी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. या ऐतिहासिक दौऱ्याने पुरंदरच्या ग्रामीण राजकारणात आणि विकासकामात एक नवा उत्साह संचारला आहे. मंत्री महोदयांचे गुरोळी गावात आगमन होताच ग्रामस्थांनी त्यांचे अभूतपूर्व स्वागत केले. गावातील तरुण आणि अबालवृद्धांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि सजवलेल्या बैलगाडीतून मंत्र्यांची भव्य मिरवणूक काढली. पर्यावरण आणि जलसंधारण: मंत्र्यांनी महादेव मंदिर परिसरातील 'मीयावाकी फॉरेस्ट' प्रकल्पाला भेट दिली. तसेच वाघदरवाडी येथील सिमेंट नाला बंधाऱ्याची पाहणी केली. जलसंवर्धनामुळे परिसरात वाढलेल्या पाणीसाठ्याचा शेतीला किती मोठा फायदा झाला आहे, याची माहिती त्यांनी शेतकऱ्यांकडून जाणून घेतली.

लोकार्पण सोहळा: ग्रामस्थांनी स्वतः श्रमदानातून तयार केलेल्या 'संत गाडगेबाबा पाणंद रस्त्याचे' उद्‌घाटन मंत्र्यांच्या हस्ते झाले. तसेच कानिफनाथ मंदिर रस्त्यावरील 'ओपन जिम' आणि १५ व्या वित्त आयोगातून प्राप्त झालेल्या नवीन 'घंटागाडीचे' लोकार्पण करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळेतील नाविन्यपूर्ण 'गुप्तहेर सांकेतिक भाषा' उपक्रमाची पाहणी करताना मंत्री महोदयांनी विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक केले.

दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात मंत्र्यांनी आडाचीवाडी गावाला भेट दिली. येथील कामांचा दर्जा पाहून त्यांनी प्रशासनाचे आणि ग्रामस्थांचे आभार मानले.

ग्रामस्थांनी श्रमदानातून उभारलेल्या या उद्यानाचे मंत्र्यांनी विशेष कौतुक केले.

स्मशानभूमीचे सुशोभीकरण, शुद्ध पाण्यासाठी वॉटर फिल्टर आणि 'छत्रपती शिवाजी महाराज सिमेंट काँक्रीट पाणंद रस्ता' या कामांची त्यांनी पाहणी केली.

नव्याने बांधण्यात येत असलेल्या 'पंचायत लर्निंग सेंटर' आणि ग्रामपंचायत इमारतीच्या कामाची पाहणी करून त्यांनी गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त केले.

मंत्र्यांनी गावात बांधलेल्या घरकुलांना भेट देऊन लाभार्थ्यांशी संवाद साधला आणि शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

गुरोळी येथील मुख्य कार्यक्रमस्थळी गावातील सर्व माजी सरपंचांच्या हस्ते मंत्री महोदयांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत प्रभावी आणि ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन पुणे जिल्हा परिषदेचे कर्मचारी श्री. आशिष जराड यांनी केले. त्यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमात रंगत आणली. उपसरपंच श्री. जीवन खेडेकर यांनी आपल्या प्रास्ताविकात गावाच्या विकासाची पार्श्वभूमी मांडली. तर गावचे भूषण श्री. प्रशांत खेडेकर यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत मिळालेल्या अनुदानातून झालेल्या कामांची माहिती दिली व भविष्यातही गावासाठी मोठा निधी मिळवण्याबाबत मंत्र्यांकडून मदतीचे आश्वासन घेतले.

या दौऱ्याप्रसंगी राज्याच्या आणि जिल्ह्याच्या प्रशासकीय यंत्रणेतील दिग्गज उपस्थित होते. यशदाचे उपमहासंचालक मा. मल्लिनाथ कलशेट्टी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चंद्रकांत वाघमारे, रायगडचे उपजिल्हाधिकारी श्री. संदेश शिर्के, प्रकल्प संचालक DRDA शालिनी कडू मॅडम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी, प्रांजल शिंदे, हवेलीचे बीडिओ शेखर शेलार, पुरंदरच्या बीडिओ प्रणोती श्रीश्रीमाळ यांचा समावेश होता.

राजकीय क्षेत्रातून नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य श्री. हरिभाऊ लोळे, जि.प. सदस्या प्राजक्ता दिगंबर दुर्गाडे, पंचायत समिती सदस्य माऊली यादव, कांबळे ताई, निगडे ताई उपस्थित होते. शेवटी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. दिगंबर दुर्गाडे सर यांनी सर्वांचे आभार मानले.

# संपादकीय

## राष्ट्रपतींच्या भेटीने चैतन्याचे वातावरण

देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नुकतीच बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव या संतनगरीला भेट देऊन श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन देखील घेतले. त्याला निमित्त झाले होते ते शेगाव येथे आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्यावतीने आयोजित आरोग्य शिबीर आणि आरोग्य परिषदेच्या उद्घाटनाचे. हे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवरही राष्ट्रपतींसोबत या संमेलनासाठी उपस्थित होते. शेगाव हे बुलढाणा जिल्ह्यातील अकोला आणि बुलढाणा या दोन जिल्ह्यांच्या सीमारेषेवर असणारे एक छोटेसे गाव, सध्या शेगाव हा तालुका झाला आहे. एरवी या गावाची लोकसंख्या जेमतेम एक लाखांच्या आसपास असावी. या गावाला खरे महत्त्व प्राप्त झाले आहे ते महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात या परिसरातील करोडो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत गजानन महाराज यांच्या समाधीस्थळामुळे. श्री संत गजानन महाराज यांचे वास्तव्य दीर्घकाळ शेगाव येथेच राहिले होते. १९०९ साली त्यांनी शेगाव येथे समाधी घेतली. त्यानंतर तिथे त्यांचे मंदिर उभे झाले आणि आज शेगाव हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. इथे फक्त भारतातूनच नव्हे तर परदेशातूनही गजानन महाराजांचे भक्त दर्शनाला येत असतात. श्री गजानन महाराज यांनी केलेल्या लोककल्याणकारी कार्याबद्दल तसेच त्यांच्या दैवी चमत्काराबद्दल अनेक कथा इथे सांगितल्या जातात. श्री संत गजानन महाराजांची पोथी देखील आज अनेक कुटुंबांमध्ये नियमित वाचली जाते आणि गावोगावी गजानन महाराजांची मंदिरे देखील उभी राहिलेली आहेत. त्यावरून त्यांचे भक्त किती मोठ्या प्रमाणात आहेत हे दिसून येते. सुरुवातीला इथे फक्त महाराजांची समाधी होती. नंतर मंदिर झाले, आता तिथे चार-पाच मोठे भक्तनिवासही झाले आहेत. त्याशिवाय इतरही सुसज्ज अशी व्यवस्था तिथे निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे लाखो भाविक इथे दर्शनाला येत असतात. त्यांची निवासाची व्यवस्था अत्यल्प दरात होत असते, तसेच भोजनादी सेवा देखील इथे होत असते. त्यामुळे हे स्थान कायम गजबजलेलेच असते. शेगाव हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असल्यामुळे सरकारने धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकास करायला हवा. तसेच हे गाव मुंबई-कलकत्ता रेल्वे मार्गाजवळ वसलेले आहे. काही ठिकाणी सुधारणांना सुरुवात झाली आहे. एरवी मुंबई-कलकत्ता रेल्वे मार्गावर शेगाव हे स्टेशन फक्त गजानन महाराज भक्तांसाठीच ओळखीचे राहिले. अन्यथा बाकी प्रवाशांसाठी शेगाव रेल्वे स्टेशनवर कचोरी चांगली मिळते म्हणून लोक आठवणीने चौकशी करतात. मात्र आज त्या कचोरीलाही जुनी चव राहिलेली नाही. संत गजानन महाराज संस्थानच्या व्यवस्थापनाने इथे व्यवस्था देखील अत्यंत चोख अशी ठेवलेली आहे. मात्र असे असले तरी आजवर या श्रद्धास्थानाला देशाचे पंतप्रधान किंवा राष्ट्रपती यांनी कधीही भेट दिली नव्हती. पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या काळात ज्यावेळी सोमनाथ मंदिराचे लोकार्पण झाले त्यावेळी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद लोकार्पणाला जाणार कळल्यावर पंडित नेहरू चांगलेच नाराज झाले होते आणि त्यांनी राजेंद्र प्रसाद यांना सोमनाथला जाण्यासाठी विरोधही केला होता अशी इतिहासात नोंद आहे. एकदा उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत हे इथल्या आनंद सागर प्रकल्पाच्या उद्घाटन समारंभासाठी येऊन गेले होते. त्यावेळी त्यांनी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले होते. त्यानंतर गेल्या २३-२४ वर्षांत द्रौपदी मुर्मु यांनी श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे प्रयत्न कारणीभूत ठरले. याआधी बुलढाणा जिल्ह्यातील मुकुल वासनिक हे देखील केंद्रीय मंत्री होते. मात्र ते काँग्रेसचे मंत्री असल्यामुळे त्यांनी कधी कोणत्याही अतिविशिष्ट व्यक्तीला शेगावला आणण्याचे प्रयत्न केले नव्हते. तो योग प्रतापराव जाधव यांच्यामुळे आला आहे.

## संस्कृत सुभाषित

अनिर्वेदः श्रियो मूलं लाभस्य च शुभस्य च॥
(उद्योगपर्व, अध्याय ३९, ५९, महाभारत)
अर्थ – लक्ष्मीचे, लाभाचे आणि कल्याणाचे मूळ सतत उद्योग करणे हे आहे.

## गुरु वचन



### निराधारांची सेवा हेच आपले कर्तव्य

एक डॉक्टर गांधीजींच्या विचाराने खूपच प्रभावित होते. व गांधींच्या जवळचे होते. एकदा ते गांधीजीसोबत बडोदाहून अलाहाबादला पोहोचले. गांधीजी येणार असल्याची माहिती पूर्वीपासूनच होती. यामुळे स्थानकावर कार्यकर्त्यांच्या जमावाची चांगलीच गर्दी झाली होती. गांधीजीचे हात रिकामे होते पण डॉक्टर साहेबाच्या हातामध्ये एक बॅग होती. रेल्वेमधून खाली उतरताच एका कार्यकर्ता पुढे जाऊन डॉक्टरच्या हातातील बॅग घेऊ लागला. डॉक्टरने त्याला मनाई केली. त्यावेळी डॉक्टरचे लक्ष्य एका वयस्कर महिलेवर गेले. तिच्या कमरेला एक लहान मुलगा होता व दुसऱ्या हातामध्ये काही सामान होते. त्यामुळे तिला चालण्यास त्रास होत होता. डॉक्टर जमावाला धक्का देत त्या महिलेपर्यंत पोहोचले आणि म्हणाले, ताई आपल्याला खूप त्रास होत आहे. हे सामान माझ्याकडे द्या, मी तुम्हाला स्थानकाबाहेर नेऊन सोडतो. ती महिला लाजू लागली. त्यानंतर डॉक्टर म्हणाले, घाबरु नका मी काही चोर वगैरे नाही. तुमचे सामान कुठेही जाणार नाही. महिलेने आपले सामान डॉक्टराकडे दिले. तेव्हा दुसरे लोकही तिथे आले. एका कार्यकर्ता डॉक्टराच्या हातून सामान घेऊ लागला. तेव्हा ते म्हणाले, हे खूप हलके आहे. मला काही त्रास होत नाही. तुम्ही लोक त्याची मदत करा, ज्याला तुमच्या मदतीची गरज आहे. निराधारांची सेवा करणे आपले कर्तव्य आणि धर्म आहे.

## उपदेशकथा

### जे घडते ते कल्याणाचे

एक संत सारखे म्हणायचे, जे घडते ते कल्याणाचे असते. एका वात्रट माणसाने त्यांची परीक्षा घेण्याचे योजले. त्याने त्या संताला घरी जेवायला बोलावले. संताने कबूल केले. जेवणामध्ये त्या माणसाने भाजी व आमटी या दोन पदार्थांना बिनवासाच्या एरंडेलची फोडणी मुद्दाम दिली. संत पोटभर जेवला. त्याने भाजी व आमटी पुन्हा पुन्हा मागितली. संध्याकाळी एरंडेलचा प्रताप सुरू झाला. रात्रभर शौचाला जाऊन संत हैराण झाला पण पहाटेच्या सुमारास त्याला एक मोठा जंत पडला आणि त्याचे शौचास होणे थांबले. तेव्हा तो प्रसन्न होऊन म्हणाला, पाहा! जे घडते ते कल्याणाचे असते हे माझे म्हणणे खरे आहे ना?

कथा उपदेश : वाईटातून चांगले घडले ते असे.

## पंचांग

विक्रम संवत्– २०८२
फाल्गुन शके
संवत्– १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– फाल्गुन
ऋतु– सौर वसंत
शुक्ल पक्ष
तिथि:पूर्णिमा १७:०७:३९
नक्षत्र:मघा ०७:३१:१४

योग:सुकर्मा १०:२३:५९
करण:बव १७:०७:३९
करण:बालव
२८:५४:२७+
सूर्य:कुम्भ
चन्द्र:सिंह
हिजरी सन् – १४४५
मुस्लिम मास – रमजान
तारीख – १३

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८७६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | 7 | 6 | 3 | 2 | 8 | | |
| | | | 8 | 1 | | | | 3 |
| 4 | 3 | | | | 5 | 1 | | |
| 6 | | | 2 | | 3 | 7 | | |
| | | | | 6 | | | | |
| | | 3 | 5 | | 9 | | | 2 |
| | | 4 | 3 | | | | 6 | 1 |
| 9 | | | | 7 | 1 | | | |
| | | 1 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८७५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 9 | 8 | 6 | 5 | 7 | 3 | 1 |
| 6 | 3 | 7 | 9 | 2 | 1 | 4 | 5 | 8 |
| 1 | 8 | 5 | 3 | 7 | 4 | 2 | 9 | 6 |
| 4 | 7 | 1 | 6 | 5 | 9 | 8 | 2 | 3 |
| 8 | 9 | 6 | 1 | 3 | 2 | 5 | 7 | 4 |
| 5 | 2 | 3 | 4 | 8 | 7 | 6 | 1 | 9 |
| 3 | 5 | 8 | 7 | 9 | 6 | 1 | 4 | 2 |
| 7 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 9 | 8 | 5 |
| 9 | 1 | 2 | 5 | 4 | 8 | 3 | 6 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ८६ – युजेनियस चौथा पोपपदी.
- १८४५ – फ्लोरिडा अमेरिकेचा २७वे राज्य झाले.
- १८४९ – मिनेसोटाला अमेरिकेचा प्रांत म्हणून मान्यता.
- १८५७ – फ्रांस व युनायटेड किंग्डमने चीन विरुद्ध युद्ध पुकारले.
- १८६३ – आयडाहोला अमेरिकेचा प्रांत म्हणून मान्यता.
- १८७८ – बल्गेरियाला ओट्टोमान साम्राज्यापासून स्वातंत्र्य.
- १९०४ – जर्मनीचा कैसर विल्हेम दुसऱ्याचा आवाज प्रथम मुद्रित केला गेला.

### राष्ट्रीय

- १९७३ – भारताच्या ओरिसा राज्यात राष्ट्रपती राजवट.
- २००८ – भारताचा टेनिसपटू महेश भूपती व त्याचा जोडीदार बहामासचा मार्क नोएल्सच्या अग्रमानांकीत जोडीने थायलँडचे जुळे भाऊ संचई व सोंचट रतिवतानाचा पराभव करत आरएमके चॅम्पियनशीप विजेतेपद पटकावले.

### जन्म

- १४५५ – जॉन दुसरा, पोर्तुगालचा राजा यांचा जन्म.
- १८३९ – जमशेटजी टाटा, भारतीय उद्योगपती यांचा जन्म.
- १८४७ – अलेक्झांडर ग्रॅहाम बेल, स्कॉटिश संशोधक यांचा जन्म.
- १९३० – इयोन इलेस्कु, रोमेनियाचा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- ५६१ – पोप पेलाजियस पहिला यांचे निधन.
- १७०७ – औरंगझेब, मुघल सम्राट यांचे निधन.
- १९३७ – आमेलिया इअरहार्ट, अमेरिकन वैमानिक (बेपत्ता) यांचे निधन.
- १९४३ – जॉर्ज थॉम्पसन, इंग्लिश क्रिकेटपटू

## : SMS :

Mandir k pujari ko loose motion ho gaya.medicine lete samay doctor ko puchha 'Any precautions ?"
Doctor said:"Shankh zor se mat bajaana...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.३ | १९.७ |
| अहमदनगर | ३१.१ | १८.५ |
| अकोला | ३४.१ | २१.२ |
| अमरावती | ३३.३ | २१.९ |
| बीड | ३६ | २२.८ |
| भंडारा | ३४.४ | २१.२ |
| बुलढाणा | २८.५ | १५ |
| चंद्रपूर | ३५.८ | २३.४ |
| चेन्नई | ३४.६ | २०.९ |
| नवी दिल्ली | २८.९ | १६.८ |
| धुळे | ३१.४ | २०.४ |
| गोंदिया | ३२.८ | २१.५ |
| जळगाव | ३३.८ | २०.६ |
| कोल्हापूर | ३१.९ | १६.६ |
| लातूर | ३१.७ | १९.८ |
| मुंबई | ३०.५ | २४.२ |
| नागपूर | ३३.९ | २०.९ |
| नांदेड | ३३.८ | २१.९ |
| नंदूरबार | २९.८ | १९.८ |
| नाशिक | ३१ | १६.६ |
| पुणे | ३०.५ | १६.७ |
| पंढरपूर | ३२.९ | २०.३ |
| सातारा | ३२.६ | १६ |
| सांगली | ३२.८ | १७.५ |
| सोलापूर | ३३.२ | २२.७ |
| वर्धा | ३५.१ | २२.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व आपल्या कामातील नियमीतपणाच आपल्याला यश देणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा,शुभ दिशा:उत्तर शुभकार्यात भाग घेतल्यामुळे आनंदी रहाल. शत्रूवर विजय मिळवाल. आळस झटकून कामास लागा.

**मिथुन :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: दक्षिण धैर्यामुळे आपली सर्वात मोठ्यातली मोठी महत्वकांक्षा पूर्ण होईल.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर घराची समस्या दूर होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. वायफळ बडबड करू नका.

**सिंह :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर गुंतवणूकीच्या योजना फायदेशीर ठरतील. स्वाध्याय व ज्ञानात भर पडणार आहे. सामाजिक कामात सक्रीय रहाल.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पूर्व अनोळखी व्यक्तिच्या सहकार्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा :उत्तर संकोच केल्यामुळे आपल्याला निष्कारण नुकसान होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पूर्व अनोळखी व्यक्तिच्या सहकार्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.


**धनु :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा :उत्तर फायद्याच्या संधी मिळून कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्साह वाढणार आहे. रागावर नियंत्रण ठेवून कामे पार पाडा.

**मकर :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात वेळेवर निर्णय घेऊ न शकल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पूर्व स्थावर संपत्तीबाबतचे वाद मिटल्यामुळे आनंदी रहाल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. व्यवसाय चांगला चालेल.

**मीन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. आधिकारी लोकांचे सहकार्य मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८७६



### आडवे शब्द

१. बिनविषारी महासर्प
३. कायमचे स्थान
६. कुंतीचे दोन पराक्रमी पुत्र
१०. किंमत
११. दार
१३. संगीतातील एक राग
१४. आमने सामने
१७. वजन
१८. लाकडाची एक उत्कृष्ट जात
१९. हिंदीत खत
२०. बहुमोल
२२. हाट
२३. कमळ
२५. रममाण
२७. कोवळी फांदी
२८. मोठा हातोडा
२९. लक्ष्मीचे एक नाव
३१. मागणी, विनंती
३२. प्रतिष्ठेचा अवयव
३४. अव्यवस्थितपणा
३६. जेमतेम
३८. मन, विचार
४०. शिखराचे टोक
४१. ओले खोबरे
४२. शेतातील आयुध
४४. पाणी
४५. दणकट
४७. डाळीचे कालवण
४८. वस्ती
५०. आदरातिथ्य
५२. बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दौर
५४. एक गड्डा भाजी
५७. रूक्ष, ५८. युद्ध
५९. गायीचे पिल्लू
६१. कर्ण
६२. वर्दळ, गर्दी
६३. बूड
६४. किंमतीतील वृद्धी
६६. पुष्परस
६७. मगज, फळातील खाद्यभाग
६९. गुप्त हस्तक
७०. सापाची एक जात
७२. बाजेची कापडी पट्टी
७५. कापडाचा एक जाडाभरडा प्रकार
७६. मत देणे
७७. मलई
७८. रविवासर
७९. साह्य

### उभे शब्द

१. अमावस्या
२. फुलांची माळ
३. मृत्यु नसलेला
४. दुसऱ्यासाठी खर्च करणे
५. मूल्य
६. गबाळा
७. नजरफेक
८. महाभारतातील शक्तीशाली गदाधर
९. इच्छा दडपून टाकणे (वाक्प्रचार)
१०. श्रीकृष्णाचे एक नाव
१२. तुळई
१५. आकर्षक
१६. श्रीकृष्णाचे द्रौपदीशी नाते
१७. अवधान, लक्ष
२१. छोटासा
२३. राष्ट्रगीतातील पहिले राज्य
२४. धाक, भीती
२६. सिद्धता
२८. ढग, दाट
३०. घरातील मधली खोली
३२. मत्स्य, मीन
३३. गप्प बसणे
३५. पशू, श्वापद
३६. कौशल्य
३९. टोळीचा प्रमुख
४०. भांडण
४२. आगमन, प्रकट होणे
४६. माहितगार
४८. मिरवत नेणे
४९. सर्वस्व
५१. एक पालेभाजी
५३. मैत्रिण
५५. नवरदेव
५६. प्रचंड, आरडाओरड
५९. परिणामकारक (हिंदी)
६०. अस्थिर
६४. हिंदुस्थान
६५. बटु अवतार
६८. ठराविक पैसे
६९. सुवर्ण
७१. पृथ्वी
७३. घाव, प्रहार
७४. सूर्याचे एक नाव
७५. शंकर

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७५ चे उत्तर

आडवे उत्तर : २.बेसुमार ४.मालक ७.फ लका ९.उर्वरित १०.देहू ११.रूम ली रोटी १२.नभ १४.शीण १५.अवतरण १७.रवानगी २०.दूर २१.वस्तरा २२.जानकी २४.सबंध २५.धार २६.ईश २८.दमा २९.टक्के ३०.साथ ३१.खुजा ३२.कस ३४.मीठ ३६.तबक ३८.हिव ३९.आळा ४०.घडवंची ४२.साडू ४५.धनू ४७.प्रज्ञा ४८.खोळ ४९.गरज ५१.लक्ष ५३.गायन ५७.पर ५९.वदन ६०.गाफील ६१.जल ६३.वार ६४.दरसाल ६६.मरगळ ६९.हल ७०.आज ७२.वंदे मातरम ७३.रेलचेल ७७.ताप ७९.गोषा ८०.हवाईसुंदरी ८२.राग ८४.दणका ८६.रगड ८८.सुरा ८९.धरा ९०.हमरस्ता ९२.पखवाज ९४.भारी ९५.साजरा ९८.नस ९९.वडस १००.बल्लव १०१.गजरा १०२.धर १०४.गुरखा १०५.बाज १०६.वापर १०७.रड १०८.मोहल्ला १०९.रममाण ११०.गाढ १११.मनधरणी

उभे उत्तर : १.सर्वत्र २.बेतशीर ३.माळा ४.माहूत ५.करूण ६.आलीशान ७.फुटीर ८.कानन १०.देवराई १३.भगीरथ १५.अस्त १६.रघु १८.वाढ १९.दुसरा २०.दूधखुळा २१.वरकड २२.जामात २३.कीटक २७.शमी ३०.सावध ३३.सवंगडी ३५.ठसा ३७.बक ३९.आज्ञा ४०.घळ ४१.चीर ४३.डूल ४४.हाय ४६.नूतन ४७.प्रतिगामी ४८.खोटी ५०.जप ५२.क्षमा ५३.गाजरहलवा ५४.नवल ५५.भालप्रदेश ५६.गाल ५८.रवाळ ६१.जलतरण ६२.थोर ६५.साल ६६.ममता ६७.गवा ६८.बेल ७१.जबरी ७३.रेषा ७४.चेहरा ७५.वसुंधरा ७६.वराह ७८.परवा ७९.गोड ८१.दरा ८३.गमन ८४.दस्ता ८५.कापड ८७.गजबज ८८.सुरी ९१.रसगुल्ला ९३.खस ९४.भाववाढ ९५.साज ९६.जरासंध ९७.कोरड ९९.वखार १०१.गरम १०२.धरणी १०३.सुमो १०५.बाण

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाराष्ट्र मुस्लिम फ्रंटतर्फे सर्वधर्मीय रोजा इफ्तार उत्साहात

पुणे (दैनिक संध्या) : पवित्र रमजान महिन्यानिमित्त महाराष्ट्र मुस्लिम फ्रंट या सामाजिक संघटनेच्या वतीने पुणे कॅम्प येथील बॉम्बे गॅरेज शेजारी विरवानी प्लाझा येथे सर्वधर्मीय रोजा इफ्तार कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र मुस्लिम फ्रंटचे संस्थापक अध्यक्ष नदीम मुजावर यांनी केले होते. विविध धर्मीय बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकोपा आणि बंधुतेचा संदेश दिला. कार्यक्रमास माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, आमिर शेख, नगरसेवक रफिक शेख, अविनाश बागवे, प्राची आल्हाट, अक्रम मदारी, राजेंद्रसिंह वालिया, खाजाभाई पठाण, इरफान शेख, युवक प्रदेश अध्यक्ष नाहीद मुजावर, महबूब नदाफ, एजाज सय्यद, मुश्ताक जिक्रे, हमीद काझी, जाकलिन फॉरेस्ट, क्रिस्ती अण्णा, मोनी सिंग, अकबर सर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी समाजातील सलोखा, बंधुता आणि शांततेचा संदेश देण्यात आला. उपस्थितांना खजूर, फळे तसेच विविध खाद्यपदार्थ देऊन रोजा सोडण्यात आला. त्यानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.




### अवघ्या 555 रुपयांत श्री महालक्ष्मी इव्हेंटने घडवली महिलांना आनंदाची 'सहल'

पुणे/नसरापूर (दैनिक संध्या) : दैनंदिन घरकाम आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या चक्रात अडकलेल्या महिलांना स्वतःसाठी आनंदाचे दोन क्षण जगता यावेत, या उदात्त हेतूने नारायणी ग्रुप, श्री महालक्ष्मी इव्हेंट सोनू जोशी आणि अदा द फॅशन स्टुडिओ निलम शेलार यांच्या वतीने नसरापूर येथील आर्यन रिव्हर वूड रिसॉर्टमध्ये एका विशेष 'वुमेन्स डे पार्टी बॅश'चे आयोजन करण्यात आले होते. अवघ्या ५५५ रुपयांच्या अल्प दरात एसी बस प्रवासापासून ते पूल पार्टीपर्यंतच्या शाही सुविधा उपलब्ध करून देत आयोजकांनी महिलांना जागतिक महिला दिनाची अनोखी भेट दिली. १ मार्च रोजी पार पडलेल्या या सहलीमध्ये सहभागी महिलांसाठी सकाळचा नाश्ता, दुपारचे चविष्ट जेवण आणि संध्याकाळचा 'हाय-टी' अशी चोख व्यवस्था करण्यात आली होती. केवळ जेवणच नव्हे, तर मनोरंजनासाठी डीजे पार्टी, पूल पार्टी आणि लाईव्ह गाण्यांच्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच महिलांच्या उत्साहात भर टाकण्यासाठी विविध खेळांचे आयोजन करून त्यांना आकर्षक भेटवस्तूही देण्यात आल्या. नारायणी ग्रुपचे विशेष सहकार्य या कार्यक्रमासाठी लाभले. ह्या उपक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे या संपूर्ण कार्यक्रमाचा अतिरिक्त खर्च आयोजकांनी स्वतः उचलला. पैशाअभावी कोणत्याही महिलेला अशा आनंदापासून वंचित राहावे लागू नये, म्हणून अत्यंत कमी नोंदणी शुल्क ठेवण्यात आले होते. "प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर मला हसू पाहायचे होते, ते स्वप्न या निमित्ताने पूर्ण झाले," अशा भावना आयोजकांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या आयोजिका सोनू जोशी आणि नीलम शेलार यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "महिला सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत घरासाठी राबत असतात. त्यांना स्वतःसाठी वेळ काढता येत नाही. त्यांनी किमान एक दिवस तरी स्वतःसाठी आनंदाने जगावे, हाच आमचा मुख्य उद्देश होता. अनेक महिलांना आर्थिक कारणांमुळे अशा रिसॉर्टवर जाणे शक्य होत नाही, म्हणून आम्ही हा संकल्प केला. महिलांना आनंदी पाहून आम्हालाही मोठे समाधान मिळाले असून, नारायणी ग्रुपचे प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचण्याचे स्वप्न या निमित्ताने सत्यात उतरले आहे." पुणे आणि परिसरातील महिलांनी या उपक्रमाचे मोठे कौतुक केले असून, "अशा उपक्रमांमुळे आम्हाला नवी ऊर्जा मिळाली," अशी प्रतिक्रिया सहभागी महिलांनी दिली.

### एण्ड टीव्ही कलाकारांची होळी साजरीकरणाची खास योजना



पुणे (दैनिक संध्या) : होळीच्या रंगोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबीय व मित्रपरिवारासोबत रंगांची उधळण करत जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा आनंद प्रत्येकजण घेत असतो. एण्ड टीव्हीवरील कलाकारही यंदा होळी साजरी करण्याच्या त्यांच्या खास योजना आणि बालपणीच्या आठवणी शेअर करत आहेत. 'हे भगवान – कितना बदल गया इंसान' मालिकेत महेश शर्मा यांची भूमिका साकारणारे जयशंकर त्रिपाठी म्हणाले, "माझ्या मूळ गावी होळी मोठ्या जल्लोषात साजरी होते. मित्रांसोबत दिवसभर रंग खेळणे आणि त्यानंतर गोड पदार्थांची मेजवानी हा आमचा नित्यक्रम होता. यंदा मालिकेच्या टीमसोबत तसेच कुटुंबासह होळी साजरी करण्याची संधी मिळणार आहे. नैसर्गिक रंग, संगीत आणि गुजिया-थंडाईशिवाय माझी होळी पूर्ण होत नाही." 'घरवाली पेडवाली' मालिकेतील सावीची भूमिका साकारणाऱ्या सीरत कपूर म्हणाल्या, "चंदीगडमध्ये माझी बालपणीची होळी खूप खास होती. रंगीत पाण्याचे फुगे, शेजाऱ्यांसोबतची धमाल आणि पुरणपोळी, मालपुआसारखे गोड पदार्थ आजही आठवतात. यंदा उद्योगातील मित्रमैत्रिणींसोबत छोटेखानी होळी समारंभ आयोजित करणार आहे." 'हप्पू की उलटन पलटन'मधील दरोगा हप्पूसिंहची भूमिका साकारणारे योगेश त्रिपाठी म्हणाले, "माझ्या गावात होळी मोठ्या उत्साहात साजरी केली जायची. सकाळपासून संध्याकाळपर्यंत रंगांची उधळण आणि गुजिया, कचोरीसारख्या पदार्थांचा आस्वाद घ्यायचो. यंदा प्रथम सेटवर सहकलाकारांसोबत आणि नंतर कुटुंबासोबत होळी साजरी करणार आहे." 'भाबीजी घर पर है २.०' मालिकेतील अंगुरी भाभीची भूमिका साकारणाऱ्या शिल्पा शिंदे म्हणाल्या, "महाराष्ट्रातील माझ्या घरी पारंपरिक होलिका दहनाने होळीची सुरुवात व्हायची. दुसऱ्या दिवशी रंगांची उधळण, गाणी आणि नृत्याचा आनंद घ्यायचो. आई बनवलेली पुरणपोळी आणि श्रीखंड आजही आठवतात. यंदाही नैसर्गिक रंगांसह आणि पारंपरिक पदार्थांसह होळी साजरी करणार आहे." प्रेक्षकांनी 'हे भगवान – कितना बदल गया इंसान' ही नवीन मालिका तसेच 'हप्पू की उलटन पलटन', 'घरवाली पेडवाली' आणि 'भाबीजी घर पर है २.०' या मालिकांचे भाग दर सोमवार ते शुक्रवार एण्ड टीव्हीवर पाहावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'कृष्ण मनोगत' कादंबरीला उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार प्रदान

पुणे (दै. संध्या) :

पुणे महानगरपालिका, मराठी भाषा संवर्धन समिती आणि यशदा आयोजित दुसऱ्या राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनात स्वामी मैत्रेय लिखित "कृष्ण मनोगत" या साहित्य कलाकृतीला "कादंबरी संवर्गात" उत्कृष्ट साहित्य पुरस्काराने गौरविण्यात आले. रविवार दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात स्वामी मैत्रेय यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आत्मकला ध्यान विज्ञान बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मैत्रेय स्वामी यांची आजवर




अनेक पुस्तके प्रसिद्ध झाले आहेत. ,"स्वस्थ शरीर ,स्वस्थ मन आणि आनंदी जीवन" हे आत्मकला ज्ञान विज्ञान बहुउद्देशीय संस्थेचे प्रमुख ब्रीदवाक्य आहे. "कृष्ण मनोगत" या कादंबरीला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळणे हा केवळ माझाच सन्मान नाही तर माझ्या लेखणीवर रसिकांनी ठेवलेल्या विश्वासाची ही पावती आहे. कृष्णावर आजवर हजारो ग्रंथ लिहिले गेले आहेत पण "कृष्ण मनोगत" लिहिताना माझ्यासमोर आव्हान होतं ते त्याच्या ईश्वरी रूपापेक्षा त्याच्या मानवी मनाचा शोध घेण्याचं! गोकुळातून वृंदावनात जाताना मथुरेत जाताना, तिथून द्वारकेत जाताना, महाभारताच्या रणधुमाळीत द्वारकेच्या वैभवात आणि सुदामाच्या मैत्रीत, कृष्णाच्या मनात नेमकं काय चालले असेल ? त्याच्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटना प्रसंगात त्याची स्वतःची भावस्थिती, त्याची मनस्थिती काय असेल ? याचा शोध घेताना ही कादंबरी साकार झाली. हे पुस्तक लिहिताना मी लेखक म्हणून उरलोच नव्हतो, तर मी स्वतः कृष्णामय झालो होतो. कृष्ण चैतन्याशी एकरूप झालो होतो. कृष्णाचा जगणं म्हणजे केवळ लिला नसून ,तो एक कर्तव्य आणि संघर्षाचा प्रवास होता, हे मी मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न ,"कृष्ण मनोगतातून" केला आहे. हा पुरस्कार मी माझ्या त्या समस्त वाचकांना अर्पण करतो असे मनोगत स्वामी मैत्रेय यांनी याप्रसंगी व्यक्त केले. प्रत्येकाने आवर्जून वाचावी अशी ही कादंबरी कधी आपल्याला कृष्ण करून टाकते हे कळतही नाही. नकारात्मकेतून सकारात्मकडे नेणारी ही कादंबरी नक्की वाचा.

विशेष उपस्थिती बिरदेव ढोणे भारतीय पोलीस सेवा प्रशिक्षणार्थी, विनायक पाटील उपजिल्हाधिकारी, शुभम पाटील उपजिल्हाधिकारी, सोनल सूर्यवंशी उपजिल्हाधिकारी, अंजली बर्गे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच राजीव नंदकर अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक यशदा पुणे हे उपस्थित होते . अनेक मान्यवरांच्या कार्य उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी ज्योतिष शास्त्रज्ञ, अंकशास्त्रज्ञ, वास्तुशास्त्रज्ञ प्राची गावडे, सुलेखाताई जक्कल, विजया जक्कल ,समिता हेर्लेकर, विजय झंवर अनेक मान्यवर उपस्थित होते.

## 'झी'कडून भारतीय सिनेमाचा जल्लोष

पुणे (दै. संध्या) :

'मारुती सुझुकी प्रस्तुत २४वे झी सिने पुरस्कार २०२६' या सोहळ्यात भारतीय सिनेमाचा भव्य उत्सव साजरा करण्यात आला. वारसा आणि नव्या पिढीच्या कथाकथनाचा मिलाफ साधत या कार्यक्रमाने 'ये पल है फॅन्स का' या संकल्पनेतून चाहत्यांना केंद्रस्थानी ठेवत 'फॅन्टरटेन्मेंट'चा अनुभव दिला. मुंबईतील एनएससीआय डोम येथे आयोजित या सोहळ्यात वर्षभरातील उल्लेखनीय कलाकृतींना सलाम करण्यात आला. जांभळ्या कार्पेटवरून या भव्य कार्यक्रमाची सुरुवात झाली. कलाकारांच्या झगमगाटमय आगमनाने वातावरण रंगत गेले. अक्षय कुमार काळ्या सूटमध्ये, विक्की कौशल आकर्षक पोशाखात, तर वरुण धवन रेट्रो शैलीत दिसला. नोरा फतेही, सोनम बाजवा आणि जॅकलिन फर्नांडिज यांनीही आपल्या




'मारुती सुझुकी प्रस्तुत २४वे झी सिने पुरस्कार २०२६'मध्ये 'फॅन्टरटेन्मेंट'चा जलवा

वेगळ्या लूकने उपस्थितांचे लक्ष वेधले. राजकुमार राव, अपारशक्ती खुराणा, क्रिती सेनॉन, रकुल प्रीत सिंह, अनन्या पांडे, अनुपम खेर आदी कलाकारांच्या उपस्थितीने सोहळ्याची शोभा वाढली.

## विशेष मुलांच्या रंगपंचमीमध्ये उपमहापौर यांचा उत्स्फूर्त सहभाग

पुणे (दै. संध्या) :

रंगपंचमीच्या निमित्ताने भोई प्रतिष्ठान तर्फे आयोजित ३१ वा रंगपंचमी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात पार पडला. पुणे शहरातील अनाथ मुले, मूकबधिर विद्यार्थी, रस्त्यावरील गरजू मुले तसेच अंध विद्यार्थ्यांसमवेत दरवर्षीप्रमाणे यंदाही हा रंगोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी उपस्थित राहून विशेष मुलांबरोबर रंगांची उधळण केली.

कार्यक्रमादरम्यान मुलांनी एकमेकांना विविध रंग लावत आनंद साजरा केला. भगवा, निळा, हिरवा, गुलाबी, पिवळा, नारंगी अशा विविध रंगांनी संपूर्ण परिसर रंगून गेला होता. मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान पाहून उपस्थितांचे मन भारावून गेले.



यावेळी बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर म्हणाले, "उपमहापौर म्हणून मला या कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले आणि या सर्व मुलांबरोबर रंगपंचमी खेळण्याची संधी लाभली, हे माझे भाग्य आहे. या चिमुकल्यांनी प्रेमाने मला रंग लावला. जसे हे विविध रंग एकत्र येऊन सुंदर चित्र तयार करतात, तसेच आपला भारत देश आणि आपले संविधान विविधतेने नटलेले आहे. अनेक जाती-धर्म, परंपरा आणि संस्कृती यांची सांगड घालत आपण एकात्मतेचा संदेश देत आहोत."

कार्यक्रमात विविध सामाजिक संस्थांनी नाश्ता, पाणी व जेवणाची व्यवस्था केली होती. विशेष म्हणजे एका मुस्लिम कुटुंबीयांनी शिरकुरमा आणून सणात सहभाग नोंदवला. विविध धर्म व समाजघटक एकत्र येऊन हा रंगोत्सव साजरा करत असल्याचे चित्र पाहून सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा सुंदर संदेश देण्यात आला. या रंगोत्सवात सहभागी होताना लहानपणच्या आठवणी ताज्या झाल्याची भावना व्यक्त करत वाडेकर म्हणाले की, "जे मुले रंगांपासून वंचित राहतात, त्यांच्यासोबत होळी खेळण्याची आणि त्यांच्या आयुष्यात आनंदाचे रंग भरता आले, याचा खरा समाधान आहे."

या कार्यक्रमाला खासदार मेधा कुलकर्णी, स्टँडिंग कमिटी चेअरमन श्रीनाथ भिमाले, उद्योजक कृष्णकुमार गोयल तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चे प्र-कुलगुरू पराग कळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## 'खडकवासला जलाशय रक्षण अभियानाची' यशस्वी द्वितपपूर्ती!

### खडकवासला जलाशय रक्षण मोहीम : पर्यावरण संवर्धनाचा एक प्रेरणादायी दीपस्तंभ !

पुणे (दै. संध्या) :

हिंदु जनजागृती समिती मागील २३ वर्षापासून खडकवासला जलाशय रक्षण मोहीम राबवत आहे. धरण परिसरात जलाशय रक्षणाची अखंड, अविरत आणि प्रेरणादायी मोहीम खडकवासला ग्रामस्थ तसेच सामाजिक जाणीव असलेल्या पुणेकरांच्या सहभागातून प्रतिवर्षी होत असते. या मोहिमेचे यंदाचे हे २४ वे वर्ष आहे. भारतीय जनता पक्षाचे विद्यमान आमदार श्री भीमराव (आण्णा) तापकीर यांनी नारळ वाढवून मोहिमेचे उद्घाटन केले. धुलीवंदन आणि रंगपंचमी या दोन्ही दिवशी जलाशयाचे पावित्र्य अबाधित राहावे या संकल्पातून हिंदु जनजागृती समितीचे कार्यकर्ते, खडकवासला ग्रामस्थ, स्थानिक प्रशासन यांच्या सहकार्याने जलाशयाभोवती मानवी साखळी करून जलाशयाचे रक्षण करतात. समितीची ही मोहीम प्रतिवर्षी




हिंदु जनजागृती समिती, खडकवासला ग्रामस्थ, पोलीस, प्रशासन,जागरूक नागरिक आणि समविचारी संघटना यांच्या वतीने हे अभियान राबवण्यात आले. प्रबोधनानंतर अनेक नागरिकांनी अभियानाचे विशेष कौतुक केले. पोलीस-प्रशासनाचेही या अभियानाला उत्तम सहकार्य लाभले. अशाच प्रकारे रंगपंचमीच्या दिवशी म्हणजे 8 मार्चलाही हे अभियान राबवण्यात येणार आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन हिंदु जनजागृती समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

शतप्रतिशत यशस्वी झाली आहे. मोहीम सुरू झाल्यापासून एकाही व्यक्तीने जलाशयात प्रवेश केला नाही. निसर्गरक्षणाचा ध्यास, समाज प्रबोधनाची तळमळ, कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे ही मोहीम पर्यावरण संवर्धनाचा एक दीपस्तंभ ठरली आहे.

पुणे शहर आणि परिसरातून आलेले २०० हून अधिक धर्मप्रेमी प्रबोधनात्मक फलक हातात धरून खडकवासला जलाशयाभोवती मानवी साखळी करून उभे होते. सकाळी ९ ते सायंकाळी ७ पर्यंत ही मोहीम राबवण्यात आली. या अभियानामध्ये स्थानिक ग्रामस्थांसह, पारगाव, दौंड, सासवड, तळेगाव, भोर,शिरवळ मांजरी, पुणे शहर अशा ठिकाणाहून जागरूक नागरिक सहभागी झाले होते.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे, खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार श्री भीमराव (आण्णा) तापकीर, पुणे महानगरपालिकेच्या भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका सौ. धनश्री दत्तात्रय कोल्हे, भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री. दत्तात्रय कोल्हे, भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे माजी अध्यक्ष सारंग नवले, नांदेड सिटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अतुल भोस, हिंदुराष्ट्र समन्वय समितीचे श्री. सचिन घुले, हिंदु जनजागृती समितीचे श्री. पराग गोखले यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.


## एण्ड टीव्हीकडून लखनौमध्ये महिला दिन विशेष उपक्रम

पुणे (दै. संध्या) :

महिला दिनानिमित्त एण्ड टीव्हीने महिलांच्या आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्वाला प्रोत्साहन देणारा विशेष उपक्रम राबवण्याची घोषणा केली आहे. ७ आणि ८ मार्च रोजी लखनौ येथील प्रसिद्ध मॉलमध्ये 'सेल्फी घ्या, चमका आणि तारा बना' या संकल्पनेअंतर्गत हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात 'भाबीजी घर पर है! २.०' मालिकेतील अंगूरी भाभीची भूमिका साकारणाऱ्या लोकप्रिय अभिनेत्री शिल्पा शिंदे ८ मार्च रोजी उपस्थित राहणार आहेत. त्या सहभागी महिलांशी संवाद साधत उपक्रमाचा उत्साह वाढवणार आहेत.

या उपक्रमामध्ये महिलांना विशेष रचलेल्या आरशासमोर सेल्फी काढण्याची संधी दिली जाणार आहे. सहभागी महिलांनी



घेतलेले छायाचित्र एण्ड टीव्हीला संकेत करून पाठवायचे आहे. निवडक महिलांना शिल्पा शिंदे यांची भेट घेण्याची संधी मिळणार असून एका विजेत्या महिलेला एण्ड टीव्हीवरील आगामी भागात झळकण्याची संधी दिली जाणार आहे.

विशेष आकर्षण म्हणून प्रतीकात्मक मुकुटासह सजवलेले आरशाचे दालन तयार करण्यात आले आहे. "महिला आणि आत्मविश्वास", "महिला आणि नेतृत्व", "महिला आणि स्वातंत्र्य", "महिला आणि आनंद" अशा संदेशांद्वारे महिलांच्या विविध भूमिका अधोरेखित केल्या जाणार आहेत.

# श्रीकृष्ण नीती समाजासाठी गरजेची आणि दिशादर्शक - मयूर भावे

## नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे व्याख्यानमाला संपन्न

पुणे (दै. संध्या) :

कृष्ण नीती म्हणजे केवळ भगवान श्रीकृष्णाने कुरुक्षेत्राच्या रणांगणावर सांगितलेले विचार नाहीत तर श्रीकृष्णाचे संपूर्ण जीवन म्हणजेच कृष्ण नेते आहे. त्यासाठी श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्व समजून घेतले पाहिजे. श्रीकृष्णाचे सर्व गुण आपल्यामध्ये येणे शक्य नाही परंतु त्या पैकी एखादा गुण आपण आत्मसात करू शकतो श्रीकृष्ण विचार हे आजही समाजासाठी गरजेचे आणि दिशादर्शक आहे असे मत ज्येष्ठ विचारवंत मयूर भावे यांनी व्यक्त केले.

नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे आयोजित करण्यात आलेल्या गरज कृष्ण नीतीची या विषयावरील व्याख्यानमालेत मयूर भावे बोलत होते. संस्थेचे




वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे, विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवे आदि यावेळी उपस्थित होते.

मयूर भावे म्हणाले, आजच्या काळामध्ये असलेला हिंसेचा अर्थ हा श्रीकृष्णाचा विचार नाही. श्रीकृष्णाचा हिंसेचा विचारवेगळा आहे. समाजाच्या हितासाठी आवश्यक असणारी हिंसा ही हिंसा ठरत नाही तर तो पराक्रम ठरतो हेच आपण महाभारतातून शकतो. आजच्या काळामध्ये अहिंसेचा चुकीचा अर्थ लावला जात आहे परंतु श्रीकृष्णाचे जो पराक्रमाचा विचार आणि शिकवण आहे ती आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

भूतकाळाचे विस्मरण होऊ न देता आणि भविष्याचा वेध मनामध्ये ठेवून वर्तमान काळ आपल्या हातातून निसटू न देणे म्हणजेच श्रीकृष्ण नीती आहे. श्रीकृष्ण नीती ही कृतीपेक्षा उद्देशाला महत्त्व देते. त्यामुळे आपला उद्देश हा कायम चांगला आणि देशाप्रती योग्य ठेवला पाहिजे. श्रीकृष्ण नीती आपल्या प्रत्यक्ष आयुष्यामध्ये अंगीकारून आपण सकारात्मक विचार मनामध्ये ठेवून देशासाठी काय करू शकतो याचा विचार प्रत्येक तरुणाने केला पाहिजे. हा विचार जर प्रत्येक तरुणाने आयुष्यामध्ये अंगीकारला तर भारत निश्चितच एक समृद्ध राष्ट्र म्हणून उदयास येऊ शकेल असेही मयूर भावे यांनी यावेळी सांगितले.

अमेय सप्रे म्हणाले, व्याख्यानमालेच्या निमित्ताने राष्ट्र प्रथम हा विचार तरुण पिढीपर्यंत पोहोचावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संस्थेच्या या कार्यामध्ये सहभागी व्हावे यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. भक्ती शक्ती उपक्रमाच्या माध्यमातून प्राचीन मंदिरांचा इतिहास समाजासमोर यावा यासाठी आम्ही कार्य करीत आहोत, तसेच बेटिंग अँप वर बंदी घालून आजच्या तरुणांचे भविष्य सुरक्षित करावे यासाठीही संस्थेने पुढाकार घेतला आहे.

भारतीय संस्कृती ही श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या विचारधारेवर उभी आहे. श्रीराम हे आदर्शवादी आहेत तर श्रीकृष्ण हे वास्तववादी आणि व्यवहारावादी आहेत. या दोन्हींचा विचार देशासाठी गरजेचा आहे. देश खऱ्या अर्थाने एक बलशाली राष्ट्र म्हणून उदयास यायचे असेल तर या दोन्ही विचारधारा आजच्या तरुणांपर्यंत पोहोचवल्या पाहिजे. नागरिक सोशल फाउंडेशन अशा प्रकारे प्रयत्न करत आहे हे निश्चितच कौतुकास्पद आहे अशी प्रशंसा मयूर भावे यांनी यावेळी केली.

सायली गोडबोले जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर पुष्कर सप्रे यांनी आभार मानले.

# भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था कडून आयएटी २०२६ जाहीर

## ५ मार्चपासून नोंदणी सुरू; ७ जून रोजी प्रवेश परीक्षा — जेईई गुणांवर प्रवेश नाही

पुणे (दै. संध्या) :


भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (आयआयएसईआर) यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी 'आयआयएसईआर योग्यता परीक्षा' (आयएटी) २०२६ जाहीर करण्यात आली आहे. देशातील सातही आयआयएसईआर संस्थांमध्ये पदवीपूर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश केवळ आयएटी गुणांच्या आधारे दिला जाणार असून, संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) गुणांवर यावर्षी प्रवेश दिला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

ऑनलाइन अर्ज प्रक्रिया ५ मार्च २०२६ पासून सुरू होणार असून अर्ज करण्याची अंतिम मुदत १३ एप्रिल २०२६ आहे. परीक्षा ७ जून २०२६ (रविवार) रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत घेण्यात येणार आहे.

सातही आयआयएसईआरमध्ये प्रवेश

आयएटी गुणांच्या आधारे पुढील सात संस्थांमध्ये प्रवेश दिला जाईल –

- आयआयएसईआर बरहमपूर
- आयआयएसईआर भोपाळ
- आयआयएसईआर कोलकाता
- आयआयएसईआर मोहाली
- आयआयएसईआर पुणे
- आयआयएसईआर तिरुवनंतपुरम
- आयआयएसईआर तिरुपती



नोंदणी व अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ https://www.iiseradmission.in/ ला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रो. सुनील एस. भागवत, संचालक, आयआयएसईआर पुणे म्हणाले, "जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि अत्याधुनिक संशोधनात कार्यरत प्राध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वातावरण मिळते. पुण्यातील शैक्षणिक व संशोधन संस्था तसेच उद्योग क्षेत्राच्या सान्निध्यामुळे विद्यार्थ्यांना प्रगतीची व्यापक संधी उपलब्ध होते."

इयत्ता १२ वी किंवा समकक्ष परीक्षा (२०२४, २०२५ किंवा २०२६) विज्ञान शाखेत किमान ६०% गुणांसह उत्तीर्ण (अनुसूचित जाती/जमाती/अपंग उमेदवारांसाठी ५५%).

जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि भौतिकशास्त्र यांपैकी किमान तीन विषयांचा अभ्यास आवश्यक.

काही विशिष्ट अभ्यासक्रमांसाठी गणित विषय अनिवार्य.

आरक्षण भारत सरकारच्या धोरणानुसार लागू राहील.

महत्त्वाच्या तारखा

- ५ मार्च २०२६ – अर्ज प्रक्रियेची सुरुवात
- १३ एप्रिल २०२६ – अर्जाची अंतिम तारीख
- १६ ते १८ एप्रिल २०२६ – अर्ज दुरुस्ती कालावधी
- २४ मे २०२६ – प्रवेशपत्र उपलब्ध

आयएटी ही परीक्षा विज्ञानाभिमुख विद्यार्थ्यांसाठी विशेष मानली जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांना जैविक, रासायनिक, गणितीय, भौतिक व पृथ्वी विज्ञानातील संशोधनाची संधी उपलब्ध होते. इंटर्नशिप, उद्योग सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय विनिमय कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक तसेच औद्योगिक क्षेत्रात उज्ज्वल करिअरची दारे खुली होतात.

उमेदवारांनी अद्ययावत माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला नियमित भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# Ai+ Smartphone कडून 'पल्स २' सादर

- ५० मेगापिक्सेल कृत्रिम बुद्धिमत्ता कॅमेरा, ६००० मिलीॲंपिअर तास बॅटरी; प्रारंभिक किंमत ५,९९९ रुपये
- विक्री ११ मार्चपासून दुपारी १२ वाजता

नवी दिल्ली (दै. संध्या) :

एआय प्लस स्मार्टफोन कंपनीने 'पल्स २' हा नवा दूरध्वनी संच सादर केला आहे. अधिक लोकांपर्यंत प्रगत तंत्रज्ञान परवडणाऱ्या किमतीत पोहोचवण्याच्या उद्देशाने हा संच विकसित करण्यात आला असून, विश्वासार्ह कार्यक्षमता, दिवसभर टिकणारी बॅटरी आणि सुलभ छायाचित्रण यांवर विशेष भर देण्यात आला आहे. या संचाची विक्री ११ मार्च रोजी दुपारी १२ वाजल्यापासून Flipkart या संकेतस्थळावर सुरू होणार आहे.

किंमत आणि प्रकार

'पल्स २' दोन प्रकारांमध्ये उपलब्ध असेल –

४ जीबी स्मरणशक्ती + ६४ जीबी संचयन

६ जीबी स्मरणशक्ती + १२८ जीबी संचयन

विशेष प्रारंभिक ऑफरअंतर्गत ४ जीबी + ६४ जीबी प्रकाराची किंमत पहिल्या २४ तासांसाठी ५,९९९ रुपये, तर ६ जीबी + १२८ जीबी प्रकाराची किंमत ७,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे.




Madhav Sheth, मुख्य कार्यकारी अधिकारी, एआय प्लस स्मार्टफोन व 'नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीज'चे संस्थापक, म्हणाले, "पल्स १ ने तयार केलेल्या मजबूत पायावर आम्ही अर्थपूर्ण सुधारणा केल्या आहेत. सक्षम कॅमेरा, विश्वासार्ह बॅटरी आणि सुरुवातीपासूनच गुळगुळीत सॉफ्टवेअर अनुभव देण्यावर आमचा भर आहे.

# तीन दिवसांत तीन अवयवदानामुळे प्रत्यारोपणाच्या प्रतिक्षेत असलेल्या रूग्णांमध्ये नव्या आशेचा किरण

- नोबल हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर तर्फे यकृत प्रत्यारोपण सेवांसह अवयव प्रत्यारोपण सेवांचा विस्तार

पुणे (दै. संध्या) :

नोबल हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटर येथे 12 फेब्रुवारी रोजी झालेल्या दोन अवयवदानांमुळे पाच जणांना नवजीवन मिळाले. फुरसुंगी येथील 32 वर्षीय मेंदूमृत शेतकऱ्याने दोन जणांना नवजीवन दिले,तर चिंचवड येथील 52 वर्षीय मेंदूमृत व्यावसायिकाने तीन जणांना नवजीवन दिले. दोन्ही परिस्थितींमध्ये रूग्णांना मेंदूतील रक्तस्त्रावानंतर (आयसी ब्लीड) 11 फेब्रुवारी रोजी मेंदूमृत घोषित करण्यात आले. नोबल हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च सेंटरचे समूह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे म्हणाले की, कुटुंबियांची संमती मिळाल्यानंतर 32 वर्षीय व्यक्तीची दोन्ही मुत्रपिंडे 11 फेब्रुवारी रोजी काढण्यात आली.

त्यापैकी एक मुत्रपिंड नाशिक येथे पाठविण्यात आले,तर दुसरे मुत्रपिंड दीर्घकालीन मुत्रपिंड विकाराने ग्रस्त असलेल्या 59 वर्षीय रुग्णावर नोबल हॉस्पिटलमध्ये प्रत्यारोपित करण्यात आले. 52 वर्षीय मेंदूमृत पुरूषाचे दोन मुत्रपिंड आणि यकृत काढण्यात आले. त्यापैकी एक मुत्रपिंड पुण्यातील दुसऱ्या रूग्णालयात पाठविण्यात आले,दुसरे मुत्रपिंड नाशिक येथे पाठविण्यात आले.तसेच यकृताच्या दीर्घकालीन आजाराने ग्रस्त असलेल्या 58 वर्षीय रूग्णावर नोबल हॉस्पिटलमध्ये यकृत प्रत्यारोपित करण्यात आले.यकृत प्रत्यारोपण झालेल्या रूग्णाला 25 फेब्रुवारी 2026 रोजी रूग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. याआधी 9 फेब्रुवारीला 60 वर्षीय मेंदूमृत महिलेने चार जणांना नवजीवन दिले.

दीर्घकालीन यकृताच्या आजाराने ग्रस्त असलेल्या 45 वर्षीय पुरूषावर हे यकृत प्रत्यारोपित करण्यात आले.यामुळे तीन दिवसांत तीन अवयवदानांसह अनेक रूग्णांना नवजीवन मिळाले.

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. शैला जालिंदर वाळूज यांचे मालकीहक्क व ताबा वहिवाटीची असून सदर मिळकत खरेदी देणे संदर्भात बोलणी होऊन सदरील मिळकत सौ. रंजना काशिनाथ बढे, सौ. अक्षया सुजित देसाई या दोघींना खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे. सदरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही खरेदी, दान, गहाण, लीज, लीन, कर्ज, कोर्ट जप्ती, ताबा, वहिवाट, करार-मदार, विसारपावती, साठेखत, कुलमुखत्यार, चोळी-बांगडी अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हस्तांतरणाचा हक्क, अधिकार, हितसंबंध वा बोजा अथवा लेखी हरकत असल्यास तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांत अस्सल कागदपत्रे दाखवून शाबीत करावा. अन्यथा, सदर मिळकतीवर कोणाचा, कसलाही हक्क, अधिकार वा बोजा नाही अथवा असल्यास तो त्यांनी स्वखुषीने सोडून दिला आहे, असे समजून सौ. रंजना काशिनाथ बढे, सौ. अक्षया सुजित देसाई खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व नंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. मिळकतीचे वर्णन मिळकत तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका जुन्नर मे. दुय्यम निबंधक सो., नारायणगाव यांचे कक्षेतील गाव मौजे वडगाव कांदळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील शेतीचे स्थानिक नाव आरखडमळा मधील गट नं. ८७७ यांसी क्षेत्र ०० हे २६ आर तसेच चतुःसीमा पूर्व बाजूस गट नं. ८४८, गट नं. ८७८, गट नं. ८७९, दक्षिण बाजूस गट नं. ८०० व गट नं. ८५४, पश्चिम बाजूस गट नं. ८७४, गट नं. ८७५ व गट नं. ८७६, उत्तर बाजूस कांदळीची शिव यांचे क्षेत्र येणेप्रमाणे मिळकतीमधील वर नमूद विद्यमान मालक यांचे मालकी ताबा वहिवाटीचे क्षेत्र मिळकत हा या नोटिशीचा विषय आहे. येणेप्रमाणे नोटीस दिली असे.

ठिकाण : नारायणगाव
दिनांक : ०२/०३/२०२६

सही/-
ॲड. राहुल दगडू गरुड, ॲडव्होकेट
सुयोग साम्राज्य बिल्डिंग नवीन रजिस्टर कचेरीच्या, बाजुला, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे, पिन कोड-४१०५०४.
मो.नं. ९९७०६४५५५५

# बायोमॅट्रीक हजेरीला महापालिका कर्मचाऱ्यांचा ठेंगा

पुणे (दै. संध्या) : पुणे महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी बायोमॅट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे आवश्यक आहे. पण फक्त तीन हजार ते साडेतीन हजार कर्मचारीच रोज बायोमॅट्रीक हजेरी लावत आहेत. त्यामुळे एकीकडे ऑनलाइन सेवेत सर्वोत्तम अशी कौतुकाची थाप घ्यायची आणि दुसरीकडे ऑनलाइन हजेरीबाबत उदासीनता दाखवायची असे दुटप्पी धोरण दिसून येत आहे. त्यामुळे १ मार्चपासून बायोमॅट्रीक हजेरी अनिवार्य करण्यात आली आहे. पुणे महापालिकेत सुमारे १७ हजार कर्मचारी आहेत. त्यापैकी सुमारे साडेसात हजार कर्मचारी हे झाडणकाम करणारे आणि बिगारी आहेत. या कर्मचाऱ्यांची हजेरी ही घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे घेतली जाते. तर उर्वरित वर्ग एक ते वर्ग चार मधील अधिकाऱ्यांची हजेरी ही बायोमॅट्रीकद्वारे घेतली जाते. महापालिकेच्या कामकाजाची वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गांव शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे व आसपासचे परिसरातील लोकांना आमचे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खाली परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही १) श्री. घनश्याम हरिश्चंद्र कडूसकर २) श्री. श्रीकृष्ण हरिश्चंद्र कडूसकर ३) श्री. गिरीश गोपीचंद कडूसकर ४) श्री. मंदार गोपीचंद कडूसकर ५) लक्ष्मी गोपीचंद कडूसकर यांचे मालकी ताबेवहिवाटीची मिळकत असून सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार हा आमचे आशिल सबा मोहम्मद एजाज पठाण, रा. चंदीपुरा पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी नोटीस मिळकतीचे जमीन मालक १) श्री. घनश्याम हरिश्चंद्र कडूसकर २) श्री. श्रीकृष्ण हरिश्चंद्र कडूसकर ३) श्री. गिरीश गोपीचंद कडूसकर ४) श्री. मंदार गोपीचंद कडूसकर ५) लक्ष्मी गोपीचंद कडूसकर यांचेसोबत करण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असलेबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षीस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी-बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क, हद्दी संदर्भात वाद, चतुःसिमांबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंदु कायद्याप्रमाणे अथवा प्रचलीत प्रथेप्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरुध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीवपुर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**परिशिष्ट**

मिळकतीचे वर्णन :- पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे कार्यक्षेत्रातील जुन्नर नगर परिषदेचे हद्दीतील शहर जुन्नर येथील सिटी सर्वे मिळकत.

| अ.क्र. | सि.स.नं. | क्षेत्र | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चौ.मी | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १. | ३२२८ | ५६.९० | लागू लेन | सि.स.नं. ३२२९ | रस्ता | सि.स.नं. ३२२७ |
| २. | ३२२९ | ६०.२० | लागू लेन | सि.स.नं. ३२३० | रस्ता | सि.स.नं. ३२२८ |

येणेप्रमाणे वर्णनाची सिटी सर्वे मिळकत त्यातील लाकूड फाटा, माती, दगड, धोंडा इत्यादी तदंगभूत वस्तुसहित तसेच सदर जागेमध्ये जाण्या-येण्याचे व वहिवाटीचे सर्व हक्क व अधिकारसुध्दा दरोबस्त मिळकत.

सही/-
गुलजारखान अब्दुल्लाखान पठाण (ॲडव्होकेट)
बी. कॉम. एल. एल. बी.
ऑफीस :- राहील कॉम्प्लेक्स, ऑफीस नं. २०४, दुसरा मजला, नेहरुबाजार, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२.
मोबा. ९९७००८००८०.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. ०१/०३/२०२६

## जेजुरी नगरपरिषद, ता. पुरंदर, जि. पुणे.

### जाहिर निविदा नोटीस

जा. क्र. - जेनपा/कावि/४०७/२०२६ | दिनांक:- ०२/०३/२०२६

जेजुरी नगरपरिषद कार्यालयात संगणक विभागाकडून खालील प्रमाणे नोंदणी केलेल्या ठेकेदार यांचेकडुन द्वि-लिफाफा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम रू. | कोरे दरपत्रक फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयात इंटरनेट सुविधा पुरविणेबाबत | २०००/- | ५००/- | ३ वर्षे |
| २ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयात संगणक, प्रिंटर, युपीएस, सर्व्हर तसेच इतर आवश्यक संगणकीय साहित्य पुरवठा करणेबाबत. जेजुरी | २०००/- | ५००/- | १ वर्षे |
| ३ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयात संगणक, प्रिंटर, युपीएस, सर्व्हर तसेच इतर आवश्यक संगणकीय साहित्य यांची देखभाल दुरुस्ती करणेबाबत. | २०००/- | ५००/- | १ वर्षे |
| ४ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयात सी. सी. टी. व्ही, इंटरकॉम, एसी, तसेच लॅनिंग करिता आवश्यक साहित्य पुरवठा करणेबाबत. | २०००/- | ५००/- | १ वर्षे |
| ५ | जेजुरी नगरपरिषद कार्यालयात सी. सी. टी. व्ही, इंटरकॉम, एसी, तसेच लॅनिंग यांची देखभाल दुरुस्ती करणेबाबत. | २०००/- | ५००/- | १ वर्षे |

१) कोरे निविदा फॉर्म दिनांक ०४/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील.
२) मोहरबंद निविदा दिनांक ०४/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारल्या जातील.
३) निविदा द्विलिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे.
a. पहिल्या लिफाफ्यात तांत्रिक बोलीची कागदपत्रे (निविदा फॉर्ममध्ये दिल्याप्रमाणे).
b. दुसऱ्या लिफाफ्यात वित्तीय बोली यानुसार द्यावे लागतील. निविदा उघडताना प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा उघडण्यात येईल व त्यानंतर वित्तीय बोलीचा लिफाफा उघडण्यात येईल.
४) निविदा बयाणा रक्कम नागरी सेवा केंद्रात रोख भरावी लागेल.
५) तसेच मंजुर निविदाधारकास योग्य त्या स्टॅंपपेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
६) सर्व शासकीय कराची व शुल्काची रक्कमेची कपात बिलातुन करणेत येईल.
७) कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार मा. मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद यांचेकडे राखुन ठेवलेले आहे.

सही/-
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११०१८

कटिबध्दा जनहिताय

स्थापत्य विभाग

ई निविदा सुचना क्र. स्थापत्य ब,ड, ह व स्थापत्य उदयान व क्रिडा कार्यालय/41/10/2025-2026

चिंचवड विधानसभा मतदार संघातील आमदार निधीची कामे

1. निविदेचा दर भरताना एकूण निविदा रकमेतुन मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून आलेल्या रकमेवर निविदा दर भरावा.
2. प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.
३. रॉयल्टी बाबत मनपा जे धोरण ठरवेल ते आपणांवर बंधनकारक राहील.

| अ. क्र. | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम (4+6) | मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | बयाणा रक्कम रूपये | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा फॉर्म फी जी.एस.टी.सह (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| | स्थापत्य ब मुख्यालय | | | | | | | | |
| १ | चिंचवड मतदार संघातील प्रभाग क्र १८ चिंचवड येथील कुणाल पार्क, मोरया गोसावी राजपार्क, रस्टन कॉलनी, रिव्हर रोड, अमित पार्क, लिंक रोड परिसरात नागरिकांसाठी वाचनालय बांधणे. | 16,79,153 | 16,47,243 | 0 | 31,910 | 16,792 | 83,960 | 12 | 2,397 |
| २ | "चिंचवड मतदारसंघातील प्रभाग क्र १८ चिंचवड कुणाल पार्क, मोरया गोसावी राजपार्क, रस्टन कॉलनी, रिव्हर रोड, अमित पार्क, लिंक रोड येथे नागरिकांसाठी वाचनालय उभारणे" | 16,79,409 | 16,47,499 | 0 | 31,910 | 16,794 | 83,980 | 12 | 2,397 |
| ३ | "चिंचवड मतदारसंघातील चिंचवडमध्ये काळेवाडीला जाणाऱ्या पुलाजवळील जागेत स्मशानभूमी विकसीत करणे, प्रेताच्या दहनासाठी स्टैंड बांधणे व पत्रा शेड बांधणे." | 16,87,255 | 16,61,870 | 2,162 | 25,385 | 16,873 | 84,370 | 12 | 2,397 |
| ४ | चिंचवड मतदारसंघातील वाल्हेकरवाडी येथील स.नं.१४१ मान सरोवर गुरूव्दारा मागे "उदय ग्लोरिअस पार्क" सहकारी गृहरचना संस्थेच्या आवारातील रस्त्यांचे तंत्रज्ञान वापरून डांबरीकरण करणे. | 8,41,222 | 7,66,132 | 15,540 | 75,090 | 8,412 | 42,070 | 12 | 1,658 |
| ५ | चिंचवड मतदारसंघात पिं.चिं.मनपाच्या ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत काळेवाडी, विजयनगर, वाल्हेकरवाडी गावठाण, प्रेमलोक पार्क, वाल्हेकरवाडी, गुरूव्दारा, मामुर्डी, किवळे, केशवनगर, तानाजीनगर, काकडे पार्क, चिंचवड गावठाण येथे सार्वजनिक वाचनालय बांधणे. (खाजगी गृहनिर्माण संस्थेच्या आवारातील/अंतर्गत भाग, खाजगी जागा वगळून) | 10,17,307 | 9,85,397 | 0 | 31,910 | 10,173 | 50,870 | 12 | 2,397 |
| | स्थापत्य उदयान व क्रिडा | | | | | | | | |
| ६ | चिंचवड मतदारसंघातील स.नं. ७४/६ रावेत, चंद्रभागा कॉर्नर येथील मनपाच्या ताब्यातील जागेवर उद्यान विकसित करणे. | 19,55,631 | 19,38,061 | 1,85,305 | 17,570 | 19,556 | 97,790 | 9 | 2,397 |
| | स्थापत्य ह मुख्यालय | | | | | | | | |
| ७ | चिंचवड विधानसभा मतदारसंघात सांगवी येथील ७४/२ (P) CTS No.2749 (P) मिरॅकल क्लासिक विंग A व B सहकारी गृहरचना संस्थेच्या आवारात जॉगिंग ट्रॅक उभारणे. (खाजगी गृहनिर्माण संस्थेच्या आवारातील/ अंतर्गत भाग/ खाजगी जागा वगळून) | 6,74,838 | 6,63,973 | 2,162 | 10,865 | 6,748 | 33,750 | 6 | 1,658 |
| | स्थापत्य ड मुख्यालय | | | | | | | | |
| ८ | चिंचवड मतदारसंघातील प्रभाग क्र.२६ विशालनगर, पिंपळे निलख येथील गणपती चौक ते छत्रपती बँक ते सोनाई पॅराडाईस ते श्रीहरी कॉलनी १२.०० मी. रस्ते डांबरीकरण करणे. | 25,22,782 | 25,10,827 | 0 | 11,955 | 25,228 | 1,26,140 | 12 | 2,397 |
| ९ | चिंचवड मतदारसंघातील पुनावळे पांढरे वस्ती बंधन स्वीट चौक येथील नेक्सस स्कायडेल गृहनिर्माण संस्थेच्या जवळ सर्व्हे नं.१४/१० (पै), १५(पै) मनपाच्या ताब्यात दिलेल्या १४३६.६५ चौ.मी. जागेत सांस्कृतीक सभागृह उभारणे. | 21,15,119 | 20,63,664 | 2,594 | 51,455 | 21,151 | 1,05,760 | 12 | 2,397 |
| १० | चिंचवड मतदारसंघातील वाकड येथील सर्व्हे नं १७३/१/१०/१ दत्त मंदिर रोड, पोलारीस हेल्थकेअर, पूजा प्लास्टिक जवळ ऐश्वर्या सहकारी गृहरचना संस्था मर्यादित अंतर्गत इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. (खाजगी गृहनिर्माण संस्थेच्या आवारातील/अंतर्गत भाग/खाजगी जागा वगळुन) | 5,09,623 | 4,80,578 | 1,081 | 29,045 | 5,096 | 25,490 | 12 | 1,658 |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| ई निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक : 03/03/2026 ते दिनांक- 10/03/2026 |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | :- | दिनांक : 10/03/2026 दुपारी 03.00 वा.पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | :- | दिनांक : 13/03/2026 दुपारी 03.00 वा. (शक्य झालेस) |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांनी स्वत:कड़े राखुन ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरु राहिल.सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. https://mahatenders.gov.in

सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-epro@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005,0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

जाहिरात क्र : 2025-26/416
क्र. स्था/06/कावि/03/2026
दिनांक : 02/03/2026

सही/-
(मकरद निकम)
शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११०१८.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापतींची निवडणूक संपन्न

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध समितींच्या सभापतीपदाची निवडणूक आज पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे संपन्न झाली. यामध्ये विधी समिती सभापतीपदी सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी राणी पठारे, शहर सुधारणा समिती सभापतीपदी संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापतीपदी कैलास कुटे आणि शिक्षण समिती सभापतीपदी रविना आंगोळकर यांची निवड झाली आहे. महापालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापती पदी निवड करण्यासाठी आज त्या त्या समितीची विशेष सभा पार पडली. या सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांचे प्रतिनिधी तथा पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी कामकाज पाहिले. नवनिर्वाचित सभापतींना पिठासीन अधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्यासह अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह नगरसदस्य व नगरसदस्या उपस्थित होते. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले. तर, विधी समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य ज्ञानेश्वर जगताप, कुंदा भिसे, कुशाग्र कदम, शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, महिला व बालकल्याण समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य पल्लवी जगताप, निता पाडाळे, रेश्मा भुजबळ, शिवानी नरळे, सुप्रिया चांदगुडे, निकिता कदम, सारिका मासूळकर, शहर सुधारणा समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य अर्चना सस्ते, कुणाल वाव्हळकर, उत्तमराव केंदळे, अनंत कोऱ्हाळे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य शाम जगताप, तानाजी बारणे, धर्मपाल तंतरपाळे, योगेश लांडगे, जितेंद्र ननवरे आणि शिक्षण समितीच्या विशेष सभेला समितीचे सदस्य पल्लवी वाल्हेकर, कविता भोंगाळे, रिटा सानप, सारिका बोऱ्हाडे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे उपस्थित होते.

### होळीनिमित्त आकर्षक सूर्यफुलांनी सजली ज्ञानेश्वर माऊलींची समाधी

आळंदी (दैनिक संध्या) : होळीच्या मंगलमय आणि रंगोत्सवी वातावरणात श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर येथे यंदा आकर्षक सूर्यफुलांच्या भव्य पुष्पसजावटीने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. रंगोत्सवाच्या पार्श्वभूमीवर साकारलेली ही अनोखी आरास भक्तांसाठी प्रमुख आकर्षण ठरली. मंदिराच्या गाभाऱ्यात आणि परिसरात हजारो झगमगत्या पिवळ्या सूर्यफुलांची सजावट करण्यात आली होती. या देखण्या आरासीतून संपूर्ण परिसर प्रसन्नता आणि चैतन्याने उजळून निघाला. पारंपरिक फुलांसह सूर्यफुलांचा कल्पकतेने वापर करून निसर्ग आणि भक्तीभाव यांचा सुंदर संगम साधण्यात आला होता. अनेक भाविकांनी या सजावटीचे कौतुक करत ती मनाला आनंद देणारी असल्याची भावना व्यक्त केली. होळी निमित्त सकाळपासून अभिषेक, कीर्तन आणि हरिनाम संकीर्तनाचे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. दर्शनासाठी राज्याच्या विविध भागांतून आलेल्या भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर प्रशासनाच्या वतीने दर्शनरांगांची योग्य नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आल्याने भाविकांना सुलभ दर्शन घेता आले. सूर्यफुलांच्या या आकर्षक आरासीतून ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीस्थळाला एक वेगळेच तेज प्राप्त झाले असून, भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात होळीचा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.

## “ज्येष्ठांमधील मुत्रविकार” या विषयावर मार्गदर्शन




**पिंपरी (दै. संध्या) :**

वाढत्या वयात मुत्रविकार टाळण्यासाठी पाण्याचे योग्य प्रमाणात सेवन करणे, संतुलित आहार ठेवणे तसेच निर्व्यसनी राहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मुत्ररोग तज्ञ डॉ. मयूर नारखेडे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित “ज्येष्ठांमधील मुत्रविकार” या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी सायंकाळी हा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमात ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या नामफलकाचे अनावरण भाजपाच्या नगरसेविका डॉ. कुंदा संजय भिसे आणि डॉ. मयूर नारखेडे यांच्याहस्ते करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सखाराम ढाकणे यांनी आपले मनोगत व्यक्त करुन दैनंदिन जीवनात मराठी भाषेचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले. कै. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर झालेल्या या कार्यक्रमात प्रारंभी रविंद्र संदानशिवे, अनिल कुलकर्णी, सुभाष विधाते, सुहास पाटोळे, नीता गुप्ता, रेखा येळंमकर यांनी हिंदी, मराठी गाणी सादर केली.

## सण पर्यावरणपूरक साजरा करा : महापौर

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव येथील शाळा क्रमांक ५४ मध्ये महापौर रवि लांडगे यांच्या संकल्पनेतून पर्यावरणपूरक होळी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याबाबत जनजागृती व्हावी आणि सणांच्या माध्यमातून मूल्यशिक्षण रुजवावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी विद्यार्थ्यांना होळी सणाचे सांस्कृतिक, सामाजिक आणि पौराणिक महत्त्व समजावून सांगितले. होळीनंतर बदलणारे ऋतुचक्र, निसर्गाशी असलेले आपले नाते, तसेच भारतीय संस्कृतीत सणांचे असलेले स्थान याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. ‘होळी हा केवळ रंगांचा सण नसून वाईट प्रवृत्तींचा त्याग करून चांगल्या विचारांचा स्वीकार करण्याचा सण आहे,’ असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक विचारांची कास धरण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी शिक्षण विभागाच्या सभापती रविना आंगोळकर, नगरसदस्य ज्ञानेश्वर जगताप, शशिकांत कदम, पर्यवेक्षक ज्योती तापकीर, श्रीकांत चौगुले, शाळेच्या मुख्याध्यापिका गीतांजली पोळ, पांडुरंग मुद्गुन तसेच शिक्षक, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच प्रतीकात्मक स्वरूपात ‘फसवणूक, खोटं बोलणे, मोह, भांडणे, स्वार्थ, चोरी, अहंकार, चिडचिड आणि भ्रष्टाचार’ या नकारात्मक प्रवृत्तींची होळी पेटविण्यात आली. समाजात प्रामाणिकपणा, बंधुभाव, पर्यावरणप्रेम आणि सामाजिक जबाबदारी यांसारखी मूल्ये रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

पिंपळे गुरव येथील शाळा क्रमांक ५४ ही महानगरपालिकेची सर्वाधिक पटसंख्या असलेली शाळा असल्याचा उल्लेख करत महापौरांनी मुख्याध्यापक व शिक्षकांचे विशेष कौतुक केले. ‘महापालिका शाळा केवळ शिक्षण देत नाहीत, तर संस्कारही घडवतात,’ असे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनी ‘होळी लहान करा, पोळी दान करा’, ‘पर्यावरण रक्षक हेच मूल्यशिक्षण’, ‘नैसर्गिक रंग वापरा, पाणी वाचवा’ अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. महापौर रवि लांडगे नैसर्गिकरित्या तयार केलेल्या रंगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमवेत होळी साजरी केली आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा आदर्श घालून दिला.

इयत्ता तिसरीच्या विद्यार्थिनींनी ‘छत्रपती शिवाजी महाराज’, ‘माझा बाबा’ आणि ‘माझी मराठी’ या कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच राधिका अग्रे हिने सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने प्रतिज्ञा घेतली की, ‘प्रत्येक वर्षी होळी नैसर्गिक रंगांच्या माध्यमातूनच साजरी करू,’ ही प्रतिज्ञा महापौरांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थी व पालकांनी घेतली.

## ‘मूकनायक’मधून दलित चळवळीला दिशा - प्रा. केशव वाघमारे

**पिंपरी (दै. संध्या) :**




‘मूकनायक’ या ऐतिहासिक पाक्षिकाचा १०६ वा वर्धापन दिन मूकनायक पत्रकार मंचच्या वतीने पिंपरी येथील सावित्रीबाई फुले स्मारक येथे उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.केशव वाघमारे आणि विजय मोकळे हे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा.वाघमारे यांनी सांगितले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर कोलंबिया विद्यापीठातून शिक्षण पूर्ण करून भारतात परतल्यानंतर त्यांनी साऊथब्युरो कमिशनसमोर दलितांच्या राजकीय हक्कांविषयी भूमिका मांडली होती. मात्र,देशातील कोणत्याही प्रमुख वृत्तपत्राने त्या ऐतिहासिक घटनेची दखल घेतली नाही.ही बाब लक्षात घेऊन समाजातील वंचित आणि दलित घटकांची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी स्वतंत्र माध्यमाची गरज असल्याची जाणीव बाबासाहेबांना झाली.

या जाणिवेतूनच ३१ जानेवारी १९२० साली 'मूकनायक' या पाक्षिकाची स्थापना करण्यात आली.‘मूकनायक’ च्या माध्यमातून दलित समाजाच्या समस्या,प्रश्न आणि हक्क यांना वाचा फोडण्याचे कार्य करण्यात आले. या पाक्षिकाने पुढील सामाजिक व राजकीय चळवळींना भक्कम वैचारिक दिशा दिली,असेही वाघमारे यांनी नमूद केले.

कार्यक्रमात ‘मूकनायक’ च्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेण्यात आला.उपस्थितांनी ‘मूकनायक’ च्या वैचारिक परंपरेला पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पिंपरी चिंचवड येथील प्रसिध्द उद्योजक मनोज गजभिये तर स्वागताध्यक्ष म्हणून कामगार नेते यशवंत भोसले हे होते.कार्यक्रमाचे उदघाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक कुणाल वाव्हळकर,धर्मपाल तंतरपाळे,सारीका मासुळकर,जेष्ठ पत्रकार नाना कांबळे,बाळासाहेब ढसाळ,बापूसाहेब गोरे,सुनिल उर्फ बाबू कांबळे,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण शिर्के, प्रशांत साळुंखे, मुकेश जाधव,सचिन सोनावणे आदी पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार मंचचे मुख्य विश्वस्त दिलीप देहाडे,विकास साळवे,निलेश सायंकर,शाम सोनवणे,शैलेश जाधव,देवा भालके,विशाल कसबे,आदींनी परीश्रम घेतले. कार्क्रमाचे सुत्रसंचलन विकास साळवे यांनी तर आभार दिलीप देहाडे यांनी मानले.

## माजी नगरसेविकेसह ४० ज्येष्ठ नागरिक दुबईत अडकले

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड शहरातील माजी नगरसेविका सुमन नेटके यांच्यासह सुमारे ४० ज्येष्ठ नागरिकांचा पर्यटनासाठी गेलेला ग्रुप सध्या दुबई येथे अडकला आहे. सांगवी परिसरातील गायकवाड कुटुंबातील सहा सदस्यांचाही या ग्रुपमध्ये समावेश आहे. अचानक निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबईतील विमानसेवा विस्कळीत झाली असून, भारताकडे येणारी उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, हा ग्रुप २५ फेब्रुवारी रोजी पर्यटनासाठी दुबईला रवाना झाला होता. नियोजित वेळापत्रकानुसार आज त्यांचे भारतात परतण्याचे ठरले होते. मात्र सुरक्षा कारणास्तव विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आल्याने त्यांचा परतीचा प्रवास अनिश्चित झाला आहे. सध्या सर्वजण सुरक्षित स्थळी थांबले असून स्थानिक प्रशासनाच्या सूचनांनुसार काळजी घेत आहेत. तरीही दुबईवरील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असल्याने त्यांच्या आरोग्याबाबतही नातेवाईक काळजी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुटकेसाठी भारत सरकार यांनी विशेष विमानांची व्यवस्था करावी, अशी मागणी कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू असून, लवकरात लवकर सुरक्षित परतीची व्यवस्था व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पारदर्शक आणि गतीमान कारभारावर भर देणार - अभिषेक बारणे

**पिंपरी (दै. संध्या) :**

- स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी पदभार स्वीकारला



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीच्या सभापती पदी निवड झाल्यानंतर अभिषेक बारणे यांनी आज आपल्या पदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारला. महापालिका भवनातील स्थायी समिती सभापतींच्या दालनात हा पदभार स्वीकारण्याचा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांनी नवनिर्वाचित सभापती अभिषेक बारणे यांचे पुष्पगुच्छ देऊन विशेष अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पदभार स्वीकारल्यानंतर नवनिर्वाचित सभापती अभिषेक बारणे यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असून नागरिकांच्या अपेक्षाही वाढत आहेत, अशा परिस्थितीत स्थायी समितीची जबाबदारी मोठी असल्याचे त्यांनी नमूद केले. शहराचा विकास आराखडा डोळ्यासमोर ठेवून रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्याला आपले सर्वोच्च प्राधान्य असेल, असे त्यांनी सांगितले.

शहराच्या विकासावर प्रतिक्रिया देताना अभिषेक बारणे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड हे देशातील एक प्रगत शहर म्हणून ओळखले जाते. या शहराचा नावलौकिक वाढवण्यासाठी पारदर्शक आणि गतीमान कारभारावर माझा भर राहील. प्रामुख्याने पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, रस्ते विकास आणि आरोग्य सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर स्थायी समितीच्या माध्यमातून ठोस निर्णय घेतले जातील. सामान्य नागरिकांच्या करातून जमा होणारा पैसा हा शहराच्या हितासाठी आणि दर्जेदार कामांसाठीच खर्च होईल, याची काटेकोरपणे खबरदारी घेतली जाईल.

## तिसऱ्या “पिंपरी चिंचवड सन्मान-२०२६” सोहळ्याचे ७ मार्च रोजी आयोजन

**पिंपरी (दै. संध्या) :**




पिंपरी-चिंचवड शहरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना तिसऱ्या “पिंपरी चिंचवड सन्मान-२०२६” पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. समाजजीवन, कला, साहित्य, पर्यावरण, क्रीडा, शेती आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाची कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना यंदा सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

यंदाचे पुरस्कार्थी पुढीलप्रमाणे : अथर्व अभय कुलकर्णी (कला व संगीत), अरुण पुराणिक (पर्यावरण संवर्धन), डॉ. राजेंद्र कांकरिया (साहित्य व शिक्षण), अनिल मित्तल (उद्योग व सामाजिक कार्य), संतोष खवळे (कृषी), कृष्णा ढोकले (गिर्यारोहण व साहसी क्रीडा), श्लोक ताम्हाणे (राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक), श्रीकांत चौगुले (निवेदन व लेखन), पांडुरंग वाघमारे (शैक्षणिक कार्य) तसेच प्रद्योत पेंढारकर (सांस्कृतिक व चित्रपट विषयक क्षेत्र). सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस राहणार आहेत. शहराला तब्बल सात वर्षांनंतर लोकनियुक्त प्रतिनिधी लाभल्याच्या पार्श्वभूमीवर नवनियुक्त महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे तसेच स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार अण्णासाहेब बनसोडे, आमदार अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### माध्यम प्रतिनिधींसाठी विशेष प्रदर्शन

या सोहळ्यानिमित्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आलेल्या “सुलतान” या लघुपटाचे माध्यम प्रतिनिधींसाठी विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हा सन्मान सोहळा शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता सायन्स पार्क, चिंचवड येथील तारांगण सभागृहात पार पडणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अविनाश कांबीकर यांनी केले आहे.

# महापौरांच्या हस्ते पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन

**पिंपरी (दै. संध्या) :**

- दिग्गज कलाकारांची उद्घाटनाला असणार उपस्थिती
- जास्तीत जास्त चित्रपट प्रेमींनी या आंतरराष्ट्रीय महोत्सवाचा लाभ घेण्याचे महापौर रवि लांडगे यांचे आवाहन

pciff 4

‘पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६’ अंतर्गत ‘क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम’ या मराठी चित्रपटाचे विशेष प्रदर्शन दि. ५ मार्च रोजी दुपारी ३ वाजता ग. दि. माडगूळकर सभागृह येथे आयोजित करण्यात आले आहे. मराठी भाषा, शिक्षण आणि सांस्कृतिक ओळख यांमधील परस्परसंबंध उलगडून दाखवणारा हा चित्रपट चित्रपटप्रेमींना मराठी भाषेच्या जतन व संवर्धनाच्या दृष्टीने चिंतनाची संधी उपलब्ध करून देईल.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी व गाथा फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय महोत्सव २०२६ चे आयोजन ३ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे करण्यात आले आहे. हा महोत्सव सकाळी १० वाजलेपासून सर्वांसाठी विनामूल्य असून जास्तीत जास्त चित्रपट प्रेमींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ चे उद्घाटन मंगळवार, ३ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संपन्न होणार असून पारितोषिक वितरण व समारोप समारंभ गुरूवार, ५ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमूख उपस्थिती तसेच खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ.अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, आयुक्त श्रावण हर्डीकर, शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उप आयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी संस्थापक दत्ता गुंड, सचिव अभिषेक अवचार, महोत्सव सचिव विश्वास शेंबेकर, पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालय प्राचार्य प्रा. डॉ. पांडुरंग भोसले, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी व्यवस्थापकीय संचालक जय भोसले, गाथा फिल्म सोसायटी अध्यक्ष पुजा गुंड, उत्सव समिती प्रमुख श्रुती शेंबेकर यांची देखील उपस्थिती लाभणार आहे.

याशिवाय, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते दिग्दर्शक सुजय डहाके, मराठी अभिनेते क्षितीश दाते यांचीही या महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थिती असणार आहे, अशी माहिती क्रीडा विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील यांनी दिली आहे.

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट अशा विविध प्रकारच्या चित्रपटांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व वयोगटातील प्रेक्षकांचा विचार करून चित्रपटांची निवड करण्यात आली असून प्रत्येक कलाकृतीतून समाजमनाला स्पर्श करणारे तसेच विचारप्रवर्तक विषय प्रभावीपणे मांडले गेले आहेत.

या महोत्सवात तब्बल ४३ देशांमधील ११६ चित्रपटांची निवड करण्यात आली असून महोत्सवात प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांद्वारे विज्ञान विरुद्ध अंधश्रद्धा, रूढीपरंपरा, समाजव्यवस्था, निसर्ग व पर्यावरण संवर्धन, तंत्रज्ञानातील बदल, प्रेम व मानवी भावना, महापूर आणि आपत्ती व्यवस्थापन तसेच महापुरुषांच्या जीवनप्रेरणादायी कार्यावर आधारित विविध विषयांचा वेध घेण्यात आला आहे. यासोबतच शिक्षण व ज्ञानप्रबोधन, महिला सक्षमीकरण आणि लैंगिक समानता, युवा नेतृत्व विकास, ग्रामीण विकास व शाश्वत प्रगती, सामाजिक समता व मानवाधिकार, आरोग्य व मानसिक स्वास्थ्य जनजागृती, बालहक्क, कला व लोकसंस्कृतीचे जतन, उद्योजकता व नवकल्पना, जागतिक शांतता, दिव्यांग सक्षमीकरण, क्रीडा प्रेरणा, हवामान बदलाबाबत जनजागृती तसेच कुटुंब व्यवस्थेतील मूल्ये अशा विविध समाजाभिमुख आणि सकारात्मक विषयांचाही समावेश करण्यात आला आहे.

चित्रपट क्षेत्रात महिला दिग्दर्शकांना अधिक संधी आणि व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महोत्सवामध्ये ‘सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक’ हा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महिला दिग्दर्शकांच्या सर्जनशील कार्याचा गौरव करणारा हा उपक्रम विशेष ठरणार असून ‘पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६’ शहराच्या सांस्कृतिक समृद्धीत भर घालण्यासोबतच नव्या विचारांना प्रेरणा देणारा उपक्रम ठरेल.

‘पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६’ अंतर्गत बुधवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी महोत्सवातील विविध स्पर्धा विभागांतील उत्कृष्ट चित्रपटांना गौरविण्यासाठी पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवादरम्यान प्रदर्शित झालेल्या लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट या विविध गटांतील निवडक चित्रपटांना सन्मानित करण्यात येणार असून ‘सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक’ या विशेष पुरस्काराचाही प्रदान करण्यात येणार आहे. या समारंभास चित्रपटसृष्टीतील मान्यवर, परीक्षक तसेच सहभागी दिग्दर्शक आणि निर्माते उपस्थित राहणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी संस्थापक दत्ता गुंड यांनी दिली आहे.



# विविध विकासकामांचे भूमिपूजन

## ड्रेनेज व रस्त्यांच्या कामांना सुरुवात

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

कुंजीरवाडी येथील थेऊरफाटा ते आंबेकरमळा-चौरेवस्ती येथे गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेला ड्रेनेज लाईनच्या कामाला सुरुवात झाली असुन आमदार माऊली कटके यांनी या कामासाठी १० लक्ष रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यासोबत धुमाळमळा येथील अंतर्गत रस्ता काँक्रिटीकारण करण्यासाठीही, १० लक्ष रुपये निधी उपलब्ध झाला आहे.
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीवेळी पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य युवराज काकडे यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन्ही जागा निवडून आल्यावर, एक महिन्यात दोन्हीही कामे मार्गी लावण्याचा शब्द दिला होता. त्याच अनुषंगाने दोन्हीही कामांचे एक महिन्याच्या आत भुमिपुजन झाल्याने येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य सौ. कोमल संदेश आव्हाळे, हवेली पंचायत समितीचे सदस्य युवराज हिरामण काकडे, माजी सरपंच संतोष कुंजीर , सचिन तुपे, माजी उपसरपंच सुरेश कुंजीर, चंद्रकांत मेमाणे, दत्तात्रय कुंजीर, विकास निगडे, गोकुळ ताम्हाणे, शिवाजी कुंजीर, भरत निगडे, नयन तुपे, योगेश गायकवाड, दिपक ताम्हाणे, कैलास तुपे, पोलीस पाटिल मिलिंद कुंजीर, तंटामुक्ती अध्यक्ष बापूसो घुले, संभाजी गायकवाड, मुकेश गायकवाड, प्रकाश धुमाळ, नंदकुमार धुमाळ, दिलीप आंबेकर, विश्वनाथ गाढवे, सुभाष कुंजीर, रामदास कुंजीर, दादासो काकडे, संतोष शिंदे, अविनाश धुमाळ, स्वप्नील काळभोर, सोमनाथ धुमाळ, विकास धुमाळ, निर्मलाताई धुमाळ, गोरख तुपे, नवनाथ आंबेकर, विशाल धुमाळ, अमोल धुमाळ, सतीश कुंजीर, गौरव कुंजीर, अमर कुंजीर, संदीपआबा धुमाळ, बाबा धुमाळ, माऊली सावंत आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कुंजीरवाडीसह जिल्हा परिषद गटातील सर्वच गावांच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे संदेश आव्हाळे व युवराज काकडे यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### होळी पौर्णिमा उत्साहात साजरी, चैत्र पौर्णिमेला होणार नायगावची यात्रा



पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्याच्या पुर्व भागातील श्री क्षेत्र नायगाव येथे होळी पौर्णिमेनिमित्त हजारो भाविकांनी श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांच्या दर्शनाचा लाभ घेतला. होळी पौर्णिमेनिमित्त पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हेच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना स्नान घालण्यात आले व अभिषेक करण्यात आला.तेजश्री पडळकर व आप्पा पडळकर यांचे सौजन्याने ह.भ.प.सुरेश महाराज सुळ(आकलुज) यांच्या सुश्राव्य किर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला.त्यांना गायन साथ मोरे महाराज,कोलते महाराज,आबा महाराज बोरकर यांनी दिली.मृदुंग साथ तेजस महाराज खेसे व अमर खेसे यांनी दिली. भजन साथ नायगाव भजनी मंडळाने दिली.श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापुजा पुजारी पार्थ जगताप यांनी केली.अन्नदान अशोक खेसे,रामदास खेसे, हनुमंत खेसे, बाळासो खेसे,युवराज खेसे, धोंडिराम कड (नायगाव),दत्तात्रय बोत्रे(यवत), प्रमोद कोठारी(पुणे),लक्ष्मण जगताप(उरूळीकांचन), बाळकृष्ण वाल्हेकर(बोरी)अन्नदान यांच्या वतीने करण्यात आले. मंदिर परिसराची स्वच्छता,लाईट,पाणी,दर्शनबारी आदिंची उत्तम व्यवस्था केली होती असे राहुल कड यांनी सांगितले.पुढील चैत्र पौर्णिमा(हनुमान जयंती) एप्रिल महिन्यात (२) तारखेला येत असून २,३,४ या तारखेला गावची यात्रा असल्याची माहिती नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर यांनी दिली.

### पेसा निर्देशांक क्रमवारीत महाराष्ट्र देशात प्रथम

नाझरे सुपे (दैनिक संध्या) : सन २०२४-२५ या वर्षासाठीच्या पेसा (PESA) संकेतकामध्ये महाराष्ट्र राज्याने देशात अव्वल क्रमांक पटकावला आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, २५ जानेवारी २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित एका विशेष सोहळ्यात केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री प्रा. एस. पी. सिंह बघेल यांनी ही क्रमवारी जाहीर केली. पाचव्या अनुसूची अंतर्गत येणाऱ्या आणि पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या १० राज्यांमध्ये ही स्पर्धा होती. यामध्ये महाराष्ट्राने बाजी मारली असून, मध्य प्रदेश दुसऱ्या तर हिमाचल प्रदेश तिसऱ्या क्रमांकावर राहिले आहे. राज्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे: अग्रणी राज्ये: १) महाराष्ट्र, २) मध्य प्रदेश, ३) हिमाचल प्रदेश चांगली कामगिरी करणारी राज्ये: ४) राजस्थान, ५) छत्तीसगड, ६) तेलंगणा आकांक्षी राज्ये: ७) आंध्र प्रदेश, ८) गुजरात प्रारंभिक राज्ये: ९) ओडिशा, १०) झारखंड महत्त्वाचे मुद्दे: उद्देश: ग्रामसभा-केंद्रित स्वशासन अधिक मजबूत करणे आणि पुराव्यावर आधारित धोरणात्मक हस्तक्षेपांना चालना देणे हा या क्रमवारीचा मुख्य हेतू आहे. कौतुक: केंद्रीय राज्यमंत्र्यांनी महाराष्ट्राचे अभिनंदन केले आणि इतर राज्यांनाही ग्रामसभा व पंचायत सक्षमीकरणासाठी प्रयत्न वाढवण्याचे आवाहन केले. उपस्थिती: या कार्यक्रमाला पंचायती राज मंत्रालयाचे सचिव श्री. विवेक भारद्वाज व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्राने मिळवलेल्या या यशामुळे अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा सक्षमीकरण आणि पंचायतींचे स्वशासन बळकट करण्यासाठी राज्य करत असलेल्या प्रयत्नांची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे.

### होळी करा लहान, पोळी करा दान या उपक्रमास प्रचंड प्रतिसाद

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कलाविष्कार मंच, स्व. गुलाबराव गोरे प्रतिष्ठान, मानस मैत्री फाउंडेशन आदींच्या संयुक्त विद्यमाने होळी करा लहान, पोळी करा दान हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. होळी या सणाचे औचित्य साधून चाकण शहरांमधून सेवाभावी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून हजारो पोळ्यांचे संकलन करण्यात आले. विशेष म्हणजे संकलित केलेल्या या पोळ्या चाकण लगतच्या पठारवाडी जवळील कातकरी वस्तीतील लहान मुलांना अन्नदान म्हणून देण्यात आल्या. त्याचबरोबर कोयाळी येथील स्नेहवन या संस्थेतील मुलांसाठीही पोळ्या देण्यात आल्या.

# भिगवणजवळील दत्तकला संस्थेत आंतरराष्ट्रीय परिषद

## मलेशियातील तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग

**भिगवण (दै. संध्या)**

दौंड तालुक्यातील स्वामी-चिंचोली येथे दत्तकला शिक्षण संस्था संचलित दत्तकला औषधनिर्माण महाविद्यालय व दत्तकला औषधनिर्माण विज्ञान व संशोधन संस्थेत दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. शैक्षणिक, संशोधनपर आणि ज्ञानवर्धक सत्रांनी परिषदेचा समारोप झाला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व राष्ट्रगीताने झाली. संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी विद्यार्थ्यांना संशोधन व नवोन्मेषासाठी प्रेरित केले, तर सचिव माया झोळ यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

परिषदेत मलेशियातील तज्ज्ञ डॉ. सॅम चान सिओकी यांनी "औषधशास्त्रातील नॅनो-आधारित विद्युत तंतू निर्मितीतील नावीन्य" या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. एनजी क्वोक वेन यांनी "एमएलएच१ कमतरतेच्या कर्करोगासाठी संयोगात्मक उपचार पद्धती" या विषयावर सखोल विवेचन केले.

औषधनिर्माण परिषद भारतचे कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. अतुलकुमार नासा यांनी औषधनिर्माण शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि भविष्यातील संधी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

गोवा, आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेशसह विविध राज्यांतील महाविद्यालयांमधून ६५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. पोस्टर सादरीकरण स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पहिल्या दिवसाचा समारोप सांस्कृतिक नृत्य कार्यक्रमाने झाला.

दुसऱ्या दिवशी डॉ. विजय कोत्रा यांनी "औषध शोध प्रक्रिया" तर डॉ. व्यंकटेश्वर राव यांनी "औद्योगिक मानके व उत्तम उत्पादन पद्धती" या विषयांवर मार्गदर्शन केले.

विजेत्यांना अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, सचिव माया झोळ आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. विशाल बाबर यांनी परिषदेची रूपरेषा आखून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. प्राचार्या डॉ. ज्योती जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. परिषदेचे संयोजक डॉ. श्रीकांत कुमार तसेच समन्वयक डॉ. हरिबा जेडगे व प्रा. अमित पोंदकुले यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या.

दोन दिवस चाललेल्या या परिषदेने विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड, नव्या तंत्रज्ञानाची जाण आणि करिअरच्या नव्या संधींबाबत सकारात्मक दृष्टी निर्माण केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



### स्पर्धांचे निकाल

- **पोस्टर सादरीकरण (पदव्युत्तर / संशोधन स्तर)**
  प्रथम – हेमरात मेश्राम (पुणे औषधनिर्माण महाविद्यालय)
  द्वितीय – सुकन्या राणे (गोवा औषधनिर्माण महाविद्यालय)
  तृतीय – अमृता दुधाळ (डेलोनिक्स औषधनिर्माण महाविद्यालय)
- **पोस्टर सादरीकरण (पदवी / पदविका स्तर)**
  प्रथम – प्रतीक्षा गवळी व शीतल इवले
  द्वितीय – अर्जुन गोरे
  तृतीय – ओंकार ढोक व दीपक काटे
- **मौखिक सादरीकरण**
- **पदव्युत्तर – प्रथम : ऋषिकेश चौधरी**
- **पदवी / पदविका –**
  प्रथम : समृद्धी सुरवसे व सृष्टी झडे
  द्वितीय : रोहन काडगी व प्रणव ध्यावरकोंडा
  तृतीय : स्वप्नाली घाडगे व प्राजक्ता शिंदे

# बी. कॉमच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

**बारामती(दै. संध्या)**



तुळजाराम चतुरचंद महाविद्याल, बारामती मधील बी.कॉम 2012-2013 उत्तीर्ण बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल 13 वर्षांनंतर एकत्रित येत स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.हा गेट-टुगेदर कार्यक्रम आर्याबाग,काटेवाडी (ता.बारामती) येथे रविवार दिनांक.1/3/26 रोजी आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आदरांजली वाहुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्व उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी आपापला अल्पपरिचय वजा मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातून बी.कॉम उत्तीर्ण होऊन प्रशासकीय अधिकारी,सीए,पत्रकार, पोलीस,वकील, व्यावसायिक, उद्योजक, शिक्षक,खेळाडू,प्रगतशील बागायतदार अशा विविध क्षेत्रात आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आपला नावलौकिक करत असल्याचे दिसून आले.या स्नेहमेळाव्यात बॅचमधील 125 ते 130 विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.13 वर्षांच्या दीर्घकाळानंतर सर्वजण एकत्रित आल्यामुळे वातावरणात आनंद,उत्साह आणि जुन्या आठवणींना उजाळा देणारा भावनिक रंग भरला होता. महाविद्यालयीन जीवनातील विविध आठवणी,सांस्कृतिक कार्यक्रम,अभ्यासातील अनुभव तसेच त्या काळातील कॉलेजचे किस्से यांची मनमोकळेपणाने देवाणघेवाण करण्यात आली. अनेक वर्षांनी पहिल्यांदाच सगळे एवढे मनमुराद हसले.

कार्यक्रमादरम्यान विविध मनोरंजनात्मक उपक्रम, खेळ तसेच चविष्ट स्नेहभोजनाचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते.काही विद्यार्थ्यांनी आपल्या नोकरी, व्यावसायिक व सामाजिक क्षेत्रातील प्रवासाविषयी माहिती देत एकमेकांना प्रेरणा दिली.सर्वांनी समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला.या कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन माजी विद्यार्थ्यांच्या समितीमार्फत करण्यात आले होते.

त्यामध्ये स्वाती ताम्हाणे,नितेश शर्मा यांनी पुढाकार घेऊन सर्वांना एकत्रित आणत आयोजनाचा कार्यभार पाहीला.

सर्वांच्या सहकार्यामुळे स्नेहमेळावा यशस्वीपणे पार पडला. शेवटी एकमेकांसोबतच्या आठवणी कॅमेऱ्यात कैद करून लवकरच भेटण्याचे आश्वासन देत कार्यक्रमाची सांगता झाली.

# मेघ मल्हार संगीत विद्यालयाच्यावतीने पुरस्कार प्रदान

**जेजुरी (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील मेघ मल्हार संगीत विद्यालयाच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त संगीत क्षेत्रात उललेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. पुरंदर तालुक्यातील मेघ मल्हार संगीत विद्यालय यांच्या वतीने वर्धापन दिन व विद्यार्थी व संगीत क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. वारकरी संप्रदायात कार्य करणारे दत्तात्रय फडतरे, लोककलावंत दशरथ लाखे,संगीत क्षेत्रातील राजेंद्र मोरे, शाहीर संगणभाऊ कलामंचाचे निवेदेक नितीन राऊत ,संगीत क्षेत्रात मदत करणाऱ्या नीलिमा खंडागळे यांना .प्रख्यात तबलावादक पंडित उमेश मोघे, ज्योतिषाचार्य सिद्धेश्वर मारटकर यांच्या हस्ते कलारत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. तसेच अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात केरळ येथील युवा तबलावादक अर्जुन काली प्रसाद यांचे दमदार सोलो तबला वादन झाले.

यावेळी चित्रपट कला दिग्दर्शक संदीप इनामके दत्तप्रसाद खाडे डॉक्टर प्रसाद खंडागळे, ॲड. मंगेश जेजुरीकर नगरसेवक रामकृष्ण मोरे ॲड. अण्णासाहेब खाडे, मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे उपस्थित होते.

# जेजुरीत ग्रामदेवता जानाई देवीच्या पालखी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत



**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीरीची ग्रामदेवता जानाई देवी पालखी सोहळ्याचे परतीच्या प्रवासात जेजुरीत जल्लोषात स्वागत करण्यात आले. जेजुरी नगरीची ग्रामदेवता आणि जागृत श्रद्धास्थान असणाऱ्या जानाई देवीचा पालखी सोहळा देवीचे मूळ स्थान असणाऱ्या सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील निवकणे खोऱ्यात यात्रेसाठी पंधरा दिवसांपूर्वी जेजुरी तून मार्गस्थ झाला होता. निवकने येथील यात्रा अतिशय धार्मिक वातावरण व विविध धार्मिक विधीनी साजरी झाली. जेजुरीतील सुमारे वीस हजार भाविक या यात्रेत सहभागी झाले होती.यात्रेनंतर हा पदयात्रा पालखी सोहळा होळी पौर्णिमेला जानाई देवीचा पालखी सोहळा परतीच्या प्रवासात सायंकाळी जेजुरी येथे पोहचला. जेजुरी नगरीत सडा रांगोळी व औक्षण करून वाजत गाजत सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. यावेळी भाविकांनी फटक्यांची आतशबजी, गुलालाची उधळण, पुरण पोळीचा नैवेद्य दाखवून चौकातील नारळाचे बोळवण केले.. रात्री उशिरा पर्यंत जेजुरी शहरातून देवीच्या रथाची मिरवणूक काढण्यात आली. देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

# बारामतीत प्रेमी युगलाला कोयत्याने मारहाण करून लुटणाऱ्या तिघांना अटक

**बारामती (दै. संध्या)**

- बारामती तालुका पोलिसांची कारवाई
- ३ लाख २४ हजारांची लूट; एलसी कंपनी लेक परिसरातील घटना
- संपूर्ण मुद्देमाल जप्त करत तिघांना अटक



बारामतीतील तांदुळवाडी येथे एलसी कंपनी लेक परिसरात तरुणावर कोयत्याने वार करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लुटल्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे.आरोपींकडून ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.२६ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ८.४० वाजण्याच्या सुमारास तांदुळवाडी विमानतळ रोडलगत असलेल्या एलसी कंपनी लेक येथील मोकळ्या जागेत फिर्यादी संतोष रायनवार (बदलेले नाव),(मूळ राहणार नागपूर वय २६, हल्ली बारामती) हे त्यांच्या मैत्रिणीसोबत बसले होते.त्यावेळी तोंडाला मास्क व रुमाल बांधलेल्या तिघा इसमांनी त्यांच्या जवळ येत लोखंडी सत्तूर,कोयत्याचा धाक दाखवून पैशांची मागणी केली. विरोध केल्यावर एका आरोपीने फिर्यादीच्या डाव्या पायावर वार करून जखमी केले.त्यानंतर आरोपींनी सोन्याची सुमारे २१ ग्रॅम वजनाची चैन (किंमत ३ लाख रुपये), चांदीची अंगठी (५ हजार रुपये),चांदीची चैन (१५ हजार रुपये),आणखी एक चांदीची अंगठी (२ हजार रुपये) व २ हजार रुपये रोख असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने काढून घेतला व 'परत इकडे यायचं नाही' अशी धमकी देत तेथून पसार झाले.याप्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात येथे बी.एन.एस कलम ३०९(६),३(५) अन्वये दाखल करण्यात आला आहे.गोपनीय माहितीवरून तपासादरम्यान प्रसाद गणपत भोसले वय-२४ धैर्यशील प्रशांत आगवणे वय-१९ व कृष्णा नाना गाडेकर वय-२१ (सर्व रा. तांदुळवाडी, ता.बारामती) यांना २८ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.पोलीस कोठडीत चौकशीदरम्यान आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव,पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील,पोलीस अंमलदार सुरेंद्र वाघ,भारत खारतोडे,मनोज पवार, जितेंद्र शिंदे,राजू बन्ने व पथकाने केली.

# आबाजी सणस ट्रस्टची ओमकार साई बाल संगोपन केंद्रास आर्थिक मदत

**डोंबिवली(दै. संध्या)**



सामाजिक कार्यात अग्रेसर, मदत-सहकार्य करण्याचे दायित्व, स्वयंरोजगार निर्मितीसाठी मार्गदर्शन, सामाजिक क्षेत्रात काम करणारी डोंबिवली येथील आबाजी सणस ट्रस्ट ही अग्रगण्य संस्था.मदत करण्याच्या उद्देशाने ओमकार साई बाल संगोपन केंद्रास आर्थिक मदत सुपूर्द करण्यासाठी नुकताच आबाजी सणस ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.प्रकाश सणस यांनी बकुळ बंगला, अवधुत सोसायटी, डोंबिवली(पश्चिम) येथे कार्यक्रम घेण्यात आला होता. त्याअगोदर कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे तात्यासाहेब माने, प्रवीण कराळे, रोहिदास सणस, गुरुनाथ तिरपणकर, ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.प्रकाश सणस,बाल संगोपन केंद्राच्या अध्यक्षा सौ.सुविधा दांडेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने व स्वामी समर्थांच्या प्रतिमेला व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. तसेच सुरुवातीला च बालसंगोपन केंद्रातील मुलांनी ईशस्तवन, स्वागत गीत सादर करुन कार्यक्रमात रंगत आणली.याप्रसंगी आबाजी सणस ट्रस्टच्या वतीने ओमकार बाल संगोपन केंद्रास उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण जिल्हा प्रमुख तात्यासाहेब माने यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत बाल संगोपन केंद्राच्या अध्यक्षा सौ.सुविधा दांडेकर यांजकडे दहा हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.तात्यासाहेब माने आपल्या भाषणात आबाजी सणस ट्रस्टच्या कार्याचा गौरव केला. ॲड.प्रकाश सणस यांनी आपले आयुष्य खडतर परिस्थितीत जगले आहेत.त्यानुसार समाजातील अडचणी सोडविण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात.हाच त्यांचा आदर्श आपण घेतला पाहिजे,असे आवर्जून सांगितले.संकल्प सिद्धी सातारा संघाचे अध्यक्ष प्रवीण कराळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना बाल संगोपन केंद्राच्या कार्याचे कौतुक केले.एक चांगला उपक्रम घेण्यासाठी ॲड.प्रकाश सणस यांनी चांगली संस्था निवडली.व ट्रस्ट ला मदत करण्याच्या दृष्टिकोनातून माझ्या कंपनीतील ट्रस्ट कडून दहा हजार रुपये मिळवून देण्याचे प्रवीण कराळे यांनी आश्वासन दिले. ट्रस्टचे सल्लागार व ॲड.प्रकाश सणस याचे फॅमिली मेंबर इंजिनिअर रोहिदास सणस यांनी आपल्या भाषणात बंधुबाबत प्रकाश सणस हे चांगले सामाजिक कार्यकर्ते आहेत.स्वत: रात्र कॉलेज करुन पत्नी व मुलांना उच्च शिक्षण देऊन एक सुशिक्षित फॅमिली निर्माण केली.रोहिदास सणस यांनीही ट्रस्ट ला आर्थिक मदत सुपूर्द केली. जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी आपली व प्रकाश सणस यांची३५वर्षापासून जुनी मैत्री आहे, आणि प्रकाश सणस यांना सामाजिक क्षेत्रात काम करण्याचा फार मोठा अनुभव आहे हे आवर्जून सांगितले.तसेच मातृत्वाच्या दृष्टिकोनातून बाल संगोपन केंद्रातील१४मुलांचे संगोपन केंद्राच्या अध्यक्षा सौ.सुविधा दांडेकर या आईच्या मायेने करत आहेत ही कौतुकास्पद बाब आहे. आणि त्यांच्या कार्याचे कौतुक केले. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने वाचनिय पुस्तके संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी केंद्राच्या अध्यक्षा सौ.सुविधा दांडेकर यांजकडे सुपूर्त केली. ट्रस्टच्या वतीने मुलांना पेन व वही भेट देण्यात आली.तसेच आबाजी सणस ट्रस्टच्या कार्यकर्त्यांना देखील बाळाबापु सणस शैक्षणिक मदत देण्यात आली.चैतन्य रामदास सणस पाच हजार रुपये, तन्वी संदीप मांढरे, दोन हजार पाचशे रुपये, मनीषा दत्तात्रय कदम दोन हजार पाचशे रुपये अशी मदत देण्यात आली.ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.प्रकाश सणस यांनी आपल्या प्रास्ताविकात आबाजी सणस ट्रस्टच्या गेल्या तीन वर्षातील सामाजिक कार्याचा आढावा घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच बाल संगोपन केंद्राच्या अध्यक्षा सौ.सुविधा दांडेकर व त्यांचे कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## “संघटकाची अष्टाध्यायी” पुस्तकाचे व ऑडिओ बुकचे प्रकाशन संपन्न

अहिल्यानगर (दै. संध्या)

■ ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे राज्याध्यक्ष डॉ. विजय लाड यांची प्रमुख उपस्थिती

ग्राहक पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष बिंदुमाधव जोशी यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या प्रबोधन पर भाषणाचे 'संघटकाची अष्टाध्यायी' या पुस्तकाचे आणि ऑडिओ बुकचे प्रकाशन ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे राज्य अध्यक्ष डॉ. विजय लाड यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्राहक पंचायत अहिल्यानगरचे उपाध्यक्ष तसेच दीपा इंडस्ट्रीजचे संचालक दत्तात्रय सोनार हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून संत साहित्याचे अभ्यासक डॉ. वसु भारद्वाज होते. ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी हे राज्य सरकारच्या ग्राहक कल्याण उच्च अधिकार समितीचे अध्यक्ष असताना महाबळेश्वर येथे ग्राहक कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या प्रबोधनपर भाषणात संघटकाची अष्टाध्यायी स्पष्ट केली होती. कुठल्याही संघटनेच्या कार्यकर्त्यांनी संघटना चालवताना कोणते आचार विचार आणि नियम पाळले पाहिजेत याविषयी अत्यंत स्पष्ट आणि परखड मत मांडून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले होते. त्या भाषणाचे पुस्तक रूपाने प्रकाशन करून तसेच ऑडिओ बुकच्या माध्यमातून कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ग्राहक पंचायतीच्या वतीने या संघटकाची अष्टाध्यायी चे प्रकाशन करण्यात आले.

यानिमित्ताने बोलताना ग्राहक पंचायतीचे राज्य अध्यक्ष डॉ. विजय लाड यांनी कुठल्याही संघटनेच्या कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याला संघटना चालवताना आठ अध्यायांच्या या गीतेमधून प्रेरणा मिळेल असा विश्वास व्यक्त केला. राज्यात ग्राहक पंचायतीचे कार्य प्रगतीपथावर असून निरलस वृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे ग्राहकांवरील अन्याय दूर होण्यास मदत मिळत आहे. यासाठी ग्राहक शिक्षणावर अधिक भर देण्याच्या दृष्टीने ग्राहक पंचायतीने आगामी काळात सक्षम कार्यकर्ता उभा राहण्यासाठी त्यांच्या प्रशिक्षणावर अधिक भर देणार असल्याचे स्पष्ट केले.

प्रारंभी ग्राहक पंचायत अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. जिल्हा सचिव सिद्धार्थ वाघमारे यांनी ग्राहक पंचायतीचा वार्षिक अहवाल उपस्थितांसमोर सादर केला. याप्रसंगी भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या सेवानिवृत्त शिक्षिका सौ. शलाका रसाळ तसेच राहुरी ग्राहक पंचायतीचे सदस्य दत्तात्रय पेरणे यांची जिल्हा कार्यकारिणीवर निवड झाली याबद्दल त्यांचा अध्यक्ष डॉ. लाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच माजी पुरवठा अधिकारी, ज्येष्ठ नागरिक संघाचे सर्वोत्तम क्षीरसागर तसेच लेखिका वैजयंती तुंगार यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ग्राहक पंचायत राहुरी तालुका अध्यक्ष डॉ. भुजाडी, अजित कटारिया आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा कोषाध्यक्ष कृष्णजी बागडे यांनी केले. हे पुस्तक व ऑडिओ बुक; अभ्यासासाठी उपलब्ध असून अधिक माहितीसाठी जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर यांच्याशी ७५८८० २९९७० या व्हाट्सअप नंबर वर संपर्क साधण्याचे आवाहन ग्राहक पंचायतीतर्फे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता सोनार यांनी केले.

# महिंद्रा लॉजिस्टिक लि.मध्ये ऐतिहासिक वेतनवाढ करार

**आमदार महेश लांडगे यांची कंपनी व्यवस्थान- संघटनेत यशस्वी मध्यस्थी; कामगारांकडून पेढे वाटून अन् फटाके फोडून करारानंतर आनंदोत्सव**

पिंपरी (दै. संध्या)

महिंद्रा लॉजिस्टिक लि. आणि स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यातील तिसरा वेतनवाढ करार संपन्न झाला असून, हा लॉजिस्टिक उद्योगातील इतिहासातील सर्वात मोठा विक्रमी करार ठरला आहे. हा करार चाकण औद्योगिक वसाहतीत निघोजे येथील कंपनीच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात औपचारिक केला गेला.या करारानंतर कामगारांनी समाधान व्यक्त केले आहे.

करार सोहळ्यात संघटनेच्या वतीने प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवन येळवंडे, तसेच कंपनीकडून असोसिएट व्हा. प्रेसिडेंट एच. आर. संजय गावडे आणि असिस्टंट व्हा. प्रेसिडेंट एच. आर. प्रदीप झोटिंग प्रमुख उपस्थित होते.



करारावर सह्या करताना

करारातील प्रमुख सुविधा पुढीलप्रमाणे आहेत. यामध्ये एकूण पगारवाढ: ₹15,500/- (CTC मध्ये), रेशो ३०%, ३०%, ४०%, विभागणी २५% DA बेसिक, ७५% इतर अलाऊन्स. कराराचा कालावधी: ०१/०३/२०२६ ते ३१/०८/२०२९ (साडेतीन वर्षे). रजा सुधारणा: ३६६ कामगारांच्या रजेत ३ दिवसांची वाढ, सर्वांसाठी समान रजा. पगाराची उचल: ग्रॉस पगाराच्या तीनपट वैद्यकीय कारणांसाठी मंजूर. ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी: ₹5 लाख. ग्रुप टर्म इन्शुरन्स पॉलिसी: ₹5 लाख. करार वेळेत पूर्ण होण्याबद्दल बक्षीस: ₹7,500/- सर्व कामगारांना. बोनस: मागील आर्थिक वर्ष २४–२५: ₹39,200/-, २०२६–२९ दरम्यान वाढीव रक्कम: ₹43,800 ते ₹59,100/-उत्पादन वाढ: पहिल्या तीन वर्षांत दर वर्षी ७%, पुढील सहा महिन्यांसाठी ३.५% असा आहे.


“महिंद्रा लॉजिस्टिकमधील कामगार हे फक्त आमच्या कंपनीचे आधारस्तंभ नाहीत, तर ते उद्योगाचा आत्मा आहेत. या कराराद्वारे आम्ही फक्त पगारवाढ देत नाही, तर कामगारांच्या जीवनमानात खऱ्या अर्थाने सुधारणा घडवून आणत आहोत. रजा, बोनस, आरोग्य सुरक्षा आणि उत्पादन वृद्धी यासारख्या सर्व बाबींचा विचार करून हा करार करण्यात आला आहे. आम्ही विश्वास ठेवतो की कामगार जेवढे सुरक्षित, संतुष्ट आणि प्रोत्साहित असतील, तितकेच कंपनीचे यश अधिक दृढ होईल. आमचा उद्देश आहे की प्रत्येक कामगाराला न्याय मिळावा, त्यांना त्यांच्या मेहनत आणि योगदानाची खरी कदर होईल, आणि हा करार त्याच दृष्टीने इतिहासात एक ठळक उदाहरण बनेल.”

**– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

संघटनेच्या वतीने आमदार महेश लांडगे, संघटनेचे मार्गदर्शक रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवनशेठ येळवंडे आणि व्यवस्थापनाकडून संजय गावडे, प्रदीप झोटिंग, धीरज सिंह, निंबा भांबरे, नामदेव टाचतोडे, राहुल भागवत यांचा समावेश होता. कार्यक्रमात सर्व उपस्थित कामगारांना मार्गदर्शन मिळाले आणि आनंद साजरा करण्यासाठी पेढे वाटणे आणि फटाके फोडण्याचा सोहळा पार पडला. संघटनेच्या नेतृत्वाखाली आणि व्यवस्थापनाच्या सहकार्याने संपन्न झालेला हा करार कामगारांच्या हक्कांचा मजबूत दाखला असून, लॉजिस्टिक क्षेत्रातील मानवी विकासाला नवीन दिशा देणारा ठरला आहे.

## ‘पु. ग. वैद्य’ कार्यगौरव पुरस्कार डॉ. सुनीलकुमार लवटे यांना जाहीर

पुणे (दै. संध्या)



अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे या मातृसंस्थेच्या वतीने दिला जाणारा यंदाचा ‘पु. ग. वैद्य कार्यगौरव पुरस्कार’ ज्येष्ठ साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुनीलकुमार लवटे यांना जाहीर करण्यात आला आहे. संस्था गेली ५१ वर्षे मुलांसाठी विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रम राबवत आहे. ‘पु. ग. वैद्य कार्यगौरव पुरस्कार’ प्रदान करण्याचे हे दुसरे वर्ष असून पुरस्कार सोहळा सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पत्रकार भवन, गांजवे चौक, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. हा पुरस्कार माजी आमदार उल्हासदादा पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून साप्ताहिक ‘साधना’चे संपादक विनोद शिरसाठ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी व कार्यवाह प्रसाद भडसावळे यांनी दिली. डॉ. सुनीलकुमार लवटे हे मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक असून साहित्यिक वि. स. खांडेकर तसेच ‘आंतरभारती’ संस्थेच्या प्रभावातून त्यांनी शिक्षणक्षेत्रात समर्पित शिक्षक, प्राध्यापक व प्राचार्य म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. कोल्हापूर येथील रिमांड होमचे बालकल्याण संकुलात रूपांतर करून वंचित व शोषित मुलांसाठी त्यांनी केलेल्या कार्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वंचित संस्थेचे अध्यक्षपद, ‘समाजसेवा’ त्रैमासिकाचे संपादन तसेच राज्यातील अनाथ आश्रम व रिमांड होम व्यवस्थेच्या विकेंद्रीकरणासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

## कामगार आयुक्त कार्यालयावर धडकणार संघटित व असंघटित कामगार

पुणे (दै. संध्या)

■ भारतीय मजदूर संघाची घोषणा

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे सहावे त्रैवार्षिक अधिवेशन रविवारी (दि. १ मार्च २०२६) महालक्ष्मी लॉन्स, कर्वेनगर येथे उत्साहात पार पडले. या अधिवेशनात विविध ठराव मंजूर करत दि. १६ एप्रिल २०२६ रोजी कामगार आयुक्त कार्यालय, बांद्रा (मुंबई) येथे भव्य आक्रोश मोर्चा काढण्याची घोषणा भारतीय मजदूर संघाच्या वतीने करण्यात आली.

अधिवेशनाचे उद्घाटन अखिल भारतीय अध्यक्ष एस. मल्लेशम यांच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्ष म्हणून खासदार मेधा कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार उपस्थित होते. अधिवेशनास राज्यभरातील सुमारे २३०० वीज कंत्राटी कामगारांनी हजेरी लावली.

उद्घाटनपर भाषणात एस. मल्लेशम यांनी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या चार कामगार संहितांपैकी वेतन संहिता व सामाजिक सुरक्षा संहिता यांचे स्वागत केले असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी तातडीने करावी, अशी मागणी केली. देशभर समान किमान तळ वेतन जाहीर करावे, निवृत्तीवेतन निधीत वाढ करावी तसेच कर्मचारी राज्य विमा योजनेची पात्रता मर्यादा २१ हजारांवरून ४२ हजार रुपयांपर्यंत वाढवावी, अशी मागणीही त्यांनी मांडली.





**पाच महत्त्वाचे ठराव मंजूर**

**अधिवेशनात पुढील पाच ठराव एकमताने मंजूर करण्यात आले :**

- हरियाणा पद्धतीप्रमाणे कंत्राटदार-मुक्त रोजगार धोरण राबवावे.
- सर्व वीज कंत्राटी कामगारांना कायम सेवेत सामावून घ्यावे.
- वीज उद्योगासाठी स्वतंत्र वेतन श्रेणी लागू करावी.
- किमान वेतनाऐवजी जीवनमानाला पूरक वेतन द्यावे.
- कर्मचारी राज्य विमा योजनेची पात्रता मर्यादा २१ हजारांवरून ४२ हजार रुपये करावी.

खासदार मेधा कुलकर्णी यांनी कंत्राटी कामगारांना कायम करण्याच्या न्यायालयीन निर्णयाचे स्वागत केले. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घ्यावा, अशी चर्चा आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाने आंदोलनाची वेळ येऊ न देता संवादातून प्रश्न सोडवावेत, असा आग्रहही त्यांनी धरला.

महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांनी न्यायालयीन निर्णयाचा अभ्यास करून कामगारांवर अन्याय होणार नाही, अशी सकारात्मक भूमिका व्यक्त केली. ग्राहक सेवेत प्रामाणिकपणा आणि सुरक्षेचे पालन करण्याची शपथ उपस्थित कामगारांनी घेतली.

२०२६ ते २०२९ या कालावधीसाठी संघाचे अध्यक्ष म्हणून निलेश खरात व सरचिटणीस म्हणून सचिन मेंगाळे यांची फेरनिवड करण्यात आली. कार्याध्यक्ष राहुल बोडके, संघटनमंत्री उमेश आणेराव, कोषाध्यक्ष सागर पवार, उपमहामंत्री अमर लोहार व अभिजीत माहुरकर यांच्यासह राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून बाळासाहेब भुजबळ यांनी जबाबदारी सांभाळली.

अधिवेशनाचा समारोप सी. व्ही. राजेश यांनी केला. पुणे जिल्हा अध्यक्ष निखील टेकवडे, सचिव योगेश महांगरे व सुमीत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजन समित्यांनी कार्यक्रम यशस्वी केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्मिता कवडे रनर अप; अभिनेत्री मधुरा देशपांडे व मांगल्ये यांच्या हस्ते सन्मानित

मुंबई (दैनिक संध्या) : लोकमत सखी आयोजित बी एन वैद्य संभागृह येथे झालेल्या फॅशन शो मध्ये स्मिता कवडे या रेट्रो थीम मध्ये ज्यात त्यानी जैत रे जैत मधील स्मिता पाटील ची भूमिका केली त्या मध्ये त्या सेमी फायनलीस्ट झाल्या तर कोरम मॉल मध्ये दिनांक २८/२/२६ रोजी झालेल्या फॅशन शो होळी थीम मध्ये त्या रनर अप म्हणून विजेत्या झाल्या.१ मार्च रोजी अभिनेत्री मधुरा देशपांडे ( शुभ मंगलम सावधान फेम ) व अभिनेत्री मांगल्ये ( आप्पी आमची कलेक्टर ) यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.स्मिता कवडे यांची सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक क्षेत्रात उंच भरारी घेत आहेत. त्या गेली १५ वर्ष कार्यरत असलेल्या सिध्दी महिला कल्याणकारी संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा आहेत.या संस्थेच्या माध्यमातून त्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती,सावित्रीबाई फुले जयंती,महापुरुषांच्या जयंत्या,महिला सक्षमीकरण व शिक्षण,अंधश्रद्धा निर्मुलन,तृतीय पंथींना रोजगार व शिक्षण, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी फॅशन शो,अंधश्रद्धा निर्मूलन,संविधान प्रचार व प्रसार आदि कार्यक्रम राबवित असतात.त्यांनी नाट्य कलावंत म्हणून आपली आवड जोपासली आहे.१०० महिलांचे नेतृत्व करणाऱ्या लोकमत सखीच्या कवडे प्रतिनिधी आहेत.मुंबई व ठाण्यात कार्यरत असलेल्या दिशा वेल्फेअर ग्रुप तसेच ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर कुर्ला तालुका या संस्थांवर त्या सदस्य म्हणून काम पाहत आहेत.मुंबई सिटीझन फोरम टी वॉर्ड च्या प्रतिनिधी आहेत.त्यांच्या यशाने त्यांचे सर्वच थरातून कौतुक होत आहे.

### कर्नाटकचे 109 नागरिक अडकले बचावासाठी परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क, केंद्राला पत्र

बंगळूर (दैनिक संध्या) : मध्यपूर्वेतील युद्धग्रस्त देशांमध्ये सुमारे १०९ कर्नाटकातील नागरिक अडकले. १०९ जणांपैकी सुमारे १०० जण दुबईत, तर ९ जण बहरीनमध्ये अडकले आहेत. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुटकेसाठी केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाशी सतत संपर्क ठेवण्यात येत आहे, अशी माहिती महसूल मंत्री कृष्णा बैरेगौडा यांनी दिली. विधानसौध येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले की, मध्यपूर्वेत तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. तेथील कर्नाटकातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये. शनिवारी रात्रीपासूनच राज्य सरकारने हेल्पलाईन सुरू केली असून, आतापर्यंत १०९ जणांनी संपर्क साधला आहे. मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांच्या सूचनेनंतर आपत्ती व्यवस्थापन विभाग तातडीने कार्यरत झाला आहे. नवी दिल्लीतील राज्याचे निवासी आयुक्तही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. परराष्ट्र मंत्रालय तेथील अडकलेल्या कन्नडिगांशी संपर्क साधत आहे. विशेष विमानाची मागणी केली असली तरी सध्या त्या भागात विमान उड्डाणांवर बंदी असल्याने तातडीने व्यवस्था शक्य नाही.

## पाच वर्षांचे पत्रकारिता पुरस्कार रखडले; मुख्यमंत्र्यांकडे मागणी

कराड (दै. संध्या)

प्रसारमाध्यम संपादक पत्रकार परिषदच्या वतीने अध्यक्ष गोरख तावरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत जाहीर झालेल्या पत्रकारिता पुरस्कारांचे तातडीने वितरण करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्र शासन दरवर्षी उत्कृष्ट पत्रकारिता, लेखन, दूरचित्रवाणी वृत्तकथा, छायाचित्रण, समाजमाध्यम तसेच स्वच्छता अभियान जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करते. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या साहित्याच्या प्रवेशिका मागवून त्यांची पडताळणी करण्यासाठी पत्रकार व अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली जाते. समितीच्या शिफारसीनंतर शासनाकडून पुरस्कारांची घोषणा केली जाते.



निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाने २०१९ ते २०२३ या कालावधीतील पुरस्कार जाहीर केले असले, तरी त्यांचे वितरण अद्याप झालेले नाही. २०२४ वर्षासाठी प्रस्ताव मागविण्यात आले; मात्र त्यावरील घोषणाही प्रलंबित आहे. दरम्यान, २०२५ वर्षासाठी प्रस्ताव मागविण्याचे आवाहन करण्यात आले असून त्याची मुदत २५ मार्चपर्यंत आहे. त्यामुळे मागील पाच वर्षांतील पुरस्कार वितरणाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. या रखडलेल्या पुरस्कारांबाबत महाराष्ट्रातील वृत्तपत्रांमध्ये वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर २०२० ते २०२३ या चार वर्षांतील पुरस्कारांची घोषणा करण्यात आली; मात्र प्रत्यक्ष वितरणाबाबत कोणतीही स्पष्टता नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पुरस्कार प्राप्त पत्रकारांमध्ये याबाबत संभ्रमाचे वातावरण असून काहींनी तर पुरस्काराबाबतची अपेक्षाच सोडल्याची चर्चा आहे. माहिती व जनसंपर्क विभाग हा मुख्यमंत्री यांच्या अखत्यारीत येत असल्याने त्यांनी या प्रकरणात लक्ष घालून तातडीने पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करावा, अशी मागणी प्रसारमाध्यम संपादक परिषदेच्या वतीने अध्यक्ष गोरख तावरे यांनी कली आहे. राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये ‘अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार’ (रु. १ लाख) तसेच मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू माध्यमांसाठी स्वतंत्र राज्यस्तरीय पुरस्कारांचा समावेश आहे. याशिवाय दूरचित्रवाणी वृत्तकथा, छायाचित्रकार, समाजमाध्यम, स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती, अग्रलेखन आदी क्षेत्रांतील प्रत्येकी ५१ हजार रुपयांचे पुरस्कार देण्यात येतात. विभागीय स्तरावर नाशिक, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, पुणे, कोकण, कोल्हापूर, अमरावती व नागपूर विभागांसाठी स्वतंत्र पुरस्कारांची तरतूद आहे.

## डॉ. प्रभाकर कांबळे गौरव पुरस्काराने सन्मानित

मुंबई (दै. संध्या)

मैत्री संस्था व उत्प्रेरक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त मी मराठी लोक चळवळ अभियान अंतर्गत मी मराठी निमंत्रिताचे कवी संमेलन व " मी मराठी राजभाषा स्वाभिमान गौरव पुरस्कार " वितरण कार्यक्रमात वनिता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गुणवंत कामगार डॉ.प्रभाकर तुकाराम कांबळे , महानंदाचे कर्मचारी व गुणवंत कामगार केरबा हरिबा डावरे, भांडुप चे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व गुणवंत कामगार बाळकृष्ण तावडे ,संजय तावडे, महेंद्र ब्रीद लालबागचे गुणवंत कामगार प्रसन्न परकर, सम्यक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र जाधव, अष्टपैलू कलाकार राजेंद्र सावंत , मंगलदीप पतपेढीचे अध्यक्ष राजू सोनकांबळे व सिडकोतील अधिकारी वैशालीताई कांबळे आदींनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल " मी मराठी राज्यभाषा स्वाभिमान गौरव पुरस्कार" प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमित, शिवाजीराव देशमुख फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष चारुशीला देशमुख, संभाजीराव राजे जाधवराव , सेन्सार फिल्म बोर्डाचे विलास खानोलकर ,आशादीप महिला मंडळाच्या अध्यक्षा आशाताई भोईर आदी मान्यवर च्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी अनिवार्य; शिवरायांचा गौरव

## विश्व मराठी संमेलनात शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांचे प्रतिपादन

नाशिक (दै. संध्या)

"नाशिकची भूमी ही प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे, तसेच ही भूमी थोर साहित्यिक आणि कलावंतांची खाण आहे. याच भूमीत कुसुमाग्रज, सावरकर आणि दादासाहेब फाळके यांच्यासारखी रत्ने घडली. ज्याप्रमाणे दर १२ वर्षांनी येथे सिंहस्थ कुंभमेळा भरतो, तसाच गेल्या तीन दिवसांपासून या 'कविवर्य कुसुमाग्रज नगरीत' मराठी भाषेचा 'साहित्य कुंभ' भरला आहे," असे गौरवद्गार राज्याचे मंत्री श्री. दादाजी भुसे यांनी काढले.





केटीएचएम महाविद्यालय (KTHM) प्रांगणात आयोजित ४ थ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात ते बोलत होते. मा. न्या. भूषण गवई, निवृत्त सरन्यायाधीश,मा. ना. प्रा. श्री. राम शिंदे, सभापती,मा. ना. ॲड. राहुल नार्वेकर, अध्यक्ष,मा. भिकल्या लाडक्या धिंडा, तारपा वादक, पद्मश्री पुरस्कार विजेते मा. अजय गोगावले, संगीतकार, मा. अतुल गोगावले, संगीतकार (विश्व मराठी संमेलन कलारत्न पुरस्कार) मा. विकास शिंदे, उपमहापौर,मा. ॲड. नितीन ठाकरे, सरचिटणीस, म. वि. प्र. मंडळ,मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव - मराठी भाषा विभाग आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. शिक्षणमंत्री श्री.भुसे यांनी यावेळी मराठी भाषेचे संवर्धन आणि शालेय शिक्षणातील बदल यावर अत्यंत प्रभावी भाष्य केले.

आपल्या भाषणात दादाजी भुसे यांनी स्पष्ट केले की, राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमांच्या आणि सर्व भाषिक शाळांमध्ये मराठी विषय शिकवणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. "मराठी ही केवळ भाषा नसून ती आपली संस्कृती आहे. त्यामुळे कोणत्याही माध्यमाची शाळा असली तरी तिथे मराठीचे धडे गिरवले गेलेच पाहिजेत, असा ठाम निर्धार शासनाने केला आहे," असे त्यांनी नमूद केले. तसेच, राष्ट्रगीतानंतर आता राज्यगीताचे (जय जय महाराष्ट्र माझा) गायन करणेही सन्मानाने बंधनकारक केल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले.

शिक्षण क्षेत्रातील ऐतिहासिक निर्णयाची माहिती देताना भुसे म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास आता केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता देशपातळीवर पोहोचला आहे. इयत्ता आठवीच्या अभ्यासक्रमात 'The Rise of Marathas' या तिसऱ्या प्रकरणात २१ पानांचा विस्तृत इतिहास समाविष्ट करण्यात आला आहे. ही प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाची गोष्ट आहे." भाषणाचा शेवट करताना श्री . भुसे यांनी कविवर्य कुसुमाग्रजांच्या अजरामर ओळींची आठवण करून दिली. कुसुमाग्रजांच्या शब्दांत सांगायचे तर, 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा!' हाच आत्मविश्वास आणि मराठीचा स्वाभिमान घेऊन आपण आपली भाषा सातासमुद्रापार नेऊया., असे आवाहन करून श्री भुसे यांनी या ऐतिहासिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे आभार मानले आणि उपस्थित साहित्यप्रेमींना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## संकुचित राजकारणासाठी सावरकरांचा माफीवीर म्हणून उल्लेख

**सावरकरांच्या त्यागाचा सन्मान करावा; माजी आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे मत**




**पुणे (दै. संध्या)**

स्वतःच्या संकुचित स्वार्थाच्या राजकारणा पोटी ज्यांना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कष्टांचे आणि त्यागाचे काही घेणेदेणे नाही, तेच लोक खुनशीपणाने सावरकरांचा उल्लेख “माफीवीर” म्हणून करतात. जे त्यांना माफीवीर म्हणतात, त्यांना सावरकरांच्या त्यागाचा सन्मान करावासा वाटत नाही. माफीची तथाकथित पत्रे ही एक स्ट्रॅटेजी आहे. जर सावरकरांचा विरोध करायचा असेल, तर तो शालीनतेने करावा; त्यांच्या त्यागाचा सन्मान करावा, असे मत माजी आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. स्वानंद चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने आयोजित, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांच्या सहकार्याने ‘मी सावरकर’ या अभिनव वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा फर्ग्युसन महाविद्यालय च्या अँफिथिएटरमध्ये संपन्न झाला. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, माजी आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी, संयोजन समिती अध्यक्ष धनंजय बर्वे, सी.ए. रणजीत नातू, प्रवीण गोखले, अमेय कुंटे, शैलेश काळकर, रवींद्र ढवळीकर, वर्षा ओक उपस्थित होते.

नाट्यवाचन स्पर्धेत दीपक दत्ता, प्रिया राजपूरकर-करे; वक्तृत्व स्पर्धेच्या वरिष्ठ गटात मेधा लोवलेकर; व्यावसायिक गटात संतोष कानडे; दुसरा आणि तिसरा गटात अनुक्रमे प्राजक्ता शेलवले, मोनिका; युवा गटात वैष्णवी परकाळे; ज्येष्ठ गटात कमलेश रामचंद्र मराठे; पहिला गटात आरुष घेरडे; संगीतमय गटात ऋचा महामुनी हे विजेते ठरले. कमलेश मराठे यांनी महाविजेतेपद पटकावले.

अविनाश धर्माधिकारी म्हणाले, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा स्पर्श ज्यांना होतो, त्यांचे जीवन उजळून निघायला सुरुवात होते. त्यांना माफीवीर म्हणणे म्हणजे निखालस खुनशीपणा आहे. यात जराही तथ्य नाही. भारताची थोरवी कशी वाढवायची हे आपल्या सगळ्यांसमोरचे महत्त्वाचे काम आहे. आपले कर्तृत्व भारतमातेसाठी अर्पण कसे करायचे हे ज्याला कळले, त्याला भारतमाता आणि सावरकर कळले, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मंजुषा नागपुरे म्हणाल्या, ‘मी सावरकर’ स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा जागरण सोहळा आहे. सावरकर हे एक नाव नसून विचार आहे. ते केवळ कवी किंवा वक्ते नाहीत, तर क्रांतिकारक आणि शब्दाला कृतीची जोड देणारे महापुरुष आहेत. सावरकरांनी सांगितलेला विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन अंगीकारणे हीच त्यांना श्रद्धांजली आहे. आपल्या कृतीत सावरकरांची राष्ट्रनिष्ठा कायम राहू द्या, असेही त्यांनी सांगितले. अशोक पलांडे म्हणाले, ‘मी सावरकर’ ही स्पर्धा नसून सावरकरांचे विचार पोहोचविण्याचे माध्यम आहे. समाजात वेगवेगळ्या विचारधारा निर्माण होत आहेत. सावरकरांचे विचार आत्मसात करावेत, हीच त्यांना श्रद्धांजली आहे. राष्ट्राचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रवीण गोखले यांनी सूत्रसंचालन केले. रणजीत नातू यांनी प्रास्ताविक केले.

# कापूरहोळमधून व्यापाऱ्याच्या मुलाचे भरदिवसा अपहरण

**नीरा पोलिसांच्या सर्जिकल नाकाबंदीत सुखरूप सुटका**

**नीरा (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्यातील कापूरहोळ परिसर आज दुपारी अक्षरशः थरारून गेला. एका नामांकित व्यापाऱ्याच्या १८ वर्षीय मुलाचे भरदिवसा अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं; मात्र जेजुरी पोलीस स्टेशन आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे काही तासांतच युवकाची सुखरूप सुटका करण्यात पोलिसांना यश आले आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी कापूरहोळ येथून एका पांढऱ्या (XUV700) MH 12XE 5353 या कारमधून युवकाला जबरदस्तीने घेऊन जाण्यात आले. हा प्रकार अचानक घडल्याने गावात एकच खळबळ उडाली. कुटुंबीयांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली, तर ग्रामसुरक्षा यंत्रणेद्वारेही मदतीचा संदेश देण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच जेजुरी पोलिसांनी निरा पोलीस दूरक्षेत्राच्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या मदतीने जेऊर–निरा मार्गावर तात्काळ नाकाबंदी उभारली.नीरा औट पोस्टचे पोलिस उपनिरीक्षक रविराज कोकरे हरिश्चंद्र करे, प्रसाद कोळेकर यांनी तातडीने कारवाई करत अपहरणर्त्याचा मार्ग बंद केला. संशयित वाहनाचा शोध सुरू असतानाच जेऊरकडून पिसुर्टीकडे जाणारी एक संशयित कार पोलिसांच्या नजरेस पडली. पोलिसांनी वाहन अडवण्याचा प्रयत्न करताच चालकाने वेग वाढवला; मात्र अरुंद रस्ता आणि घाईगडबडीत कार उसाच्या शेतात जाऊन कार अडकली. आणि परिस्थितीने नाट्यमय वळण घेतले.

**नीरा येथील पोलिसांचे लोकांकडून कौतुक**

दरम्यान नीरा येथील तीन पोलीस कर्मचाऱ्यांनी कोणताही विलंब न करता तातडीने कार्यवाही केली आणि त्यामुळेच मुलाची सुटका करणे शक्य झाले. त्यामुळे नीरा आणि परिसरातील नागरिकांकडून पोलिसांच्या या कामाचं कौतुक होत आहे. नीरा पोलिसांनी निराशहरात चौकात तर नाकाबंदी केली होतीच. मात्र अपहरणकर्त्यांच्या शोधासाठी त्यांनी स्वतःहून पुढाकार घेतला व शहरापासून साधारण पाच किलोमीटर पुढे जात अपहरण कर्त्यांची नाकाबंदी केली. अरुंद रस्त्यावर वाहन आडवे लावून अपहरण कर्त्यांना रोखून धरले.



अपहरणकर्त्यांनी उसाच्या पिकाचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला; पण पोलिसांनी तत्परतेने कारमधून युवकाला बाहेर काढत त्याची सुरक्षित सुटका केली.

यानंतर जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे आणि त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली... त्यानंतर युवकाला वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले असून तो सुखरूप असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

“पोलिसांनी तात्काळ नाकाबंदी केल्यामुळे मुलाची सुरक्षित सुटका शक्य झाली. आरोपींचा शोध सुरू आहे,” अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी दिली. दरम्यान, अपहरणामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आर्थिक वाद, खंडणी की वैयक्तिक वैर या सर्व शक्यतांचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि वाहनाच्या तपासातून महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या धाडसी कारवाईमुळे कापूरहोळ परिसराने सुटकेचा नि:श्वास टाकला असला, तरी आरोपींच्या अटकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## परदेशात अडकलेल्या नागरिकांसाठी खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांचा मदतीचा हात

**पुणे (दै. संध्या)**



सध्या सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र तसेच भारतातील अनेक नागरिक दुबई आणि इराण यासारख्या देशांमध्ये अडकून पडले आहेत. हवाई सेवा बंद झाल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांची उड्डाणे रद्द झाल्यामुळे हॉटेलमध्ये मुक्काम वाढवावा लागत असून, खर्च व इतर व्यवस्थापनाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालय व विमान वाहतूक विभागाने नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यासाठी व्यापक स्तरावर तयारी सुरू केली आहे. अडकलेल्या प्रवाशांमध्ये विद्यार्थी, पर्यटक तसेच इतर नागरिकांचा समावेश असून त्यांना आवश्यक मदत मिळावी यासाठी समन्वय यंत्रणा सक्रिय करण्यात आली आहे. दरम्यान, परदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांनी कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास थेट संपर्क साधावा, असे आवाहन राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले आहे. केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सेवा व सुविधा संबंधितांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले. मदतीसाठी ९४२२०३७३०६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये, हा केंद्र सरकारचा मुख्य उद्देश असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक ती सर्व तयारी करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. संबंधित यंत्रणा नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर असून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यात येत असल्याचे त्या म्हणाल्या.

## पुणे जिल्हा परिषदेच्या ३,००० विद्यार्थ्यांचा विज्ञानाचा ‘महासंगम’

**नाझरे सुपे (दै. संध्या)**

**आयुका आणि आयसर मध्ये ऐतिहासिक सहभाग**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी 'पुणे मॉडेल' सज्ज; इस्रो आणि नासा भेटीचे वेध राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पुणे जिल्हा परिषद आणि शहरातील प्रमुख वैज्ञानिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञानाचे एक नवे दालन खुले झाले. जिल्ह्यातील ५० हून अधिक शाळांमधील ३,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी 'इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर अॅस्ट्रॉनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स'(आयुका) आणि 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च' (आयसर) पुणे येथे आयोजित कार्यक्रमांत सक्रिय सहभाग नोंदवत विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.



आयुकामध्ये १,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी 'ओपन डे'चा आनंद लुटला. यावेळी विद्यार्थ्यांनी: लिगो (गुरुत्वीय लहरी), अर्थ पेंडुलम आणि इस्रोच्या विविध मोहिमांचे मॉडेल्स पाहून अत्याधुनिक संशोधनाची माहिती घेतली.

व्याख्याने, वैज्ञानिक प्रात्यक्षिके आणि प्रदर्शनांच्या माध्यमातून अवकाशातील गुपिते उलगडली. कार्यक्रमाचा समारोप सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या भव्य आकाश निरीक्षण (स्टार गेझिंग) सत्राने झाला.

यावेळी आयुका चे संचालक प्रा. श्री.आनंद यांनी जिल्हा परिषदेसोबतच्या सामंजस्य कराराचा उल्लेख करत, भविष्यात ग्रामीण शाळांसोबतचे हे सहकार्य अधिक घट्ट करण्याचा पुनरुच्चार केला.

आयसर पुणे: 'विकसित भारत' आणि विज्ञानातील महिला

आयसर पुणे येथे विज्ञानातील महिला: विकसित भारत उत्प्रेरक या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय कार्यक्रम पार पडला. येथे २,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधला.

पद्मश्री अरविंद गुप्ता यांचे "छोटी खेळणी - मोठे विज्ञान" हे सत्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरले. साध्या टाकाऊ वस्तूंपासून विज्ञान कसे शिकता येते, याचे धडे त्यांनी दिले. ५० शाळांपैकी झेडपी शाळा कोरेगाव बुद्रुक ((विज्ञान आणि गेमिंग) ) आणि झेडपी शाळा बोतरवाडी (वायू प्रदूषण कसे कमी करावे) या दोन शाळांच्या प्रकल्पांची अंतिम स्टेम प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी प्रशासनाची ठाम भूमिका मांडली. ते म्हणाले, "जिल्हा परिषद शाळांमध्ये आधुनिक विज्ञान आणि खगोलशास्त्र प्रयोगशाळा उभारण्यावर आमचा भर आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक संधी मिळवून देण्यासाठी आम्ही इस्रो आणि नासा सारख्या संस्थांच्या भेटींचे आयोजन करणार आहोत."

जिल्हा शिक्षण अधिकारी भाऊसाहेब कारेकर आणि संजय नाईकडे यांनी आगामी वर्षाची रूपरेषा मांडताना सांगितले की, पारदर्शक निवड प्रक्रियेद्वारे (परीक्षा व मुलाखत) गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना एनडीए, जीएमआरटी, आयुका आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ संस्थांच्या भेटीसाठी पाठवले जाईल. ग्रामीण व शहरी शिक्षणातील दरी कमी करणे हाच या 'पुणे मॉडेल स्कूल' संकल्पनेचा गाभा असल्याचे सिद्धार्थ चव्हाण यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### किसान सन्मान कार्यक्रम; स्टिहल इंडियाकडून देशव्यापी ‘परिवर्तन यात्रा’चा शुभारंभ

बारामती (दैनिक संध्या) : भारतीय शेतीला तांत्रिक बळकटी देत यांत्रिकीकरणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने स्टिहल इंडिया तर्फे कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके), बारामती येथे ‘किसान सन्मान’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर आणि शाश्वत शेतीत मोलाचे योगदान देणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास परिंद प्रभू देसाई (व्यवस्थापकीय संचालक, स्टिहल इंडिया), शोभित बहेल (विपणन संचालक), प्रद्युम्न चतुर्वेदी (व्यापार विपणन व्यवस्थापक) तसेच राजेंद्र पवार (अध्यक्ष, कृषी विकास ट्रस्ट) आणि केव्हीके बारामतीचे वरिष्ठ अधिकारी व कृषी वैज्ञानिक उपस्थित होते. शेतकरी, कृषी तज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमादरम्यान श्री. देसाई यांनी वाढती अन्नधान्याची मागणी, मजूरांची कमतरता आणि कार्यक्षमतेची गरज लक्षात घेता यांत्रिकीकरण ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. अत्याधुनिक आणि सुरक्षित यंत्रसामग्रीद्वारे शेतकऱ्यांची उत्पादकता व नफा वाढविण्यासाठी स्टिहल इंडिया कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. ‘किसान सन्मान’ उपक्रमांतर्गत आधुनिक तंत्रज्ञान आणि यांत्रिक साधनांचा प्रभावी वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. सन्मानित शेतकऱ्यांनी त्यांच्या यशोगाथा मांडत इतरांना आधुनिक शेती तंत्रज्ञान स्वीकारण्याचे आवाहन केले. याच वेळी स्टिहल इंडियाने देशव्यापी ‘परिवर्तन यात्रा’चा शुभारंभ केला. ही यात्रा देशातील १०० कृषी विज्ञान केंद्रांशी जोडली जाणार असून विविध ठिकाणी थेट प्रात्यक्षिके, तांत्रिक मार्गदर्शन, सुरक्षित आणि कार्यक्षम यंत्र वापराबाबत शिक्षण तसेच शेतीतील यांत्रिकीकरणाचा व्यापक प्रसार केला जाणार आहे. अधिक माहितीसाठी स्टिहल इंडिया टोल फ्री क्रमांक ९०२८४११२२२ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमातून भारतीय शेती अधिक उत्पादक, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या दिशेने कंपनीची वचनबद्धता अधोरेखित झाली आहे.


### अपघात; हजारपेक्षा जास्त लोकांची उपस्थिती अन् लाईटचा गार्डर कोसळला

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातल्या कोरेगाव पार्क-मुंढवा रोड परिसरातील रॉयल फॉर्म येथे होळीनिमित्त आयोजित कार्यक्रमादरम्यान मोठा अपघात घडला. कार्यक्रमस्थळी उभारण्यात आलेला लाईटचा गर्डर अचानक कोसळल्याने सुमारे 15 ते 16 तरुण-तरुणी जखमी झाले आहेत. ‘कलर कल्चर’ या होळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन कोरेगाव पार्क-मुंढवा रोड परिसरात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सुमारे 1100 नागरिक उपस्थित होते.

## नीरामध्ये जी.बी.एस. सदृश्य रुग्ण आढळला; आरोग्य यंत्रणा सतर्क

**नीरा (दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील नीरा येथे ५१ वर्षीय व्यक्तीमध्ये जी.बी.एस. (गिलियन-बारे सिंड्रोम) या आजाराच्या निदानाशी सुसंगत अहवाल आल्याने आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. संबंधित रुग्णावर सध्या पुणे येथील भारती रुग्णालयात उपचार सुरू असून नीरा प्राथमिक आरोग्य केंद्राकडून खबरदारीच्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सदर



व्यक्ती गेल्या सहा दिवसांपासून नीरा येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत होती. अशक्तपणा, हात-पायाला मुंग्या येणे, अंगात शक्ती कमी होणे अशी लक्षणे दिसून येत होती. खाजगी डॉक्टरांनी महागडी इंजेक्शने देत उपचार केले; मात्र दोन दिवसांपूर्वी श्वसनाचा त्रास वाढल्याने रुग्णाला पुढील उपचारासाठी पुण्यात हलविण्यात आले. विविध वैद्यकीय तपासण्या केल्यानंतर जी.बी.एस. या आजाराच्या निदानाशी सुसंगत असा अहवाल प्राप्त झाला. या संदर्भात पुरंदर तालुका पंचायत समितीचे आरोग्य अधिकारी डॉ. विक्रम काळे यांनी सांगितले की, संबंधित रुग्णामध्ये जी.बी.एस. सदृश्य लक्षणे आढळली असून अहवालाने त्यास दुजोरा दिला आहे. हा आजार संसर्गजन्य नसून प्रामुख्याने दूषित पाणी किंवा अन्नामुळे होणाऱ्या संसर्गानंतर शरीराच्या प्रतिकारशक्तीतील बिघाडामुळे उद्भवू शकतो. योग्य वेळी उपचार मिळाल्यास हा आजार तात्पुरता असून रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो. आरोग्य विभागाकडून परिसरात जनजागृती, पाणी व स्वच्छतेबाबत सूचना, तसेच लक्षणे आढळल्यास त्वरित प्राथमिक आरोग्य केंद्रात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहावे, स्वच्छ पाणी पिणे, अन्नाची स्वच्छता राखणे आणि अशक्तपणा, मुंग्या येणे, श्वसनाचा त्रास अशी लक्षणे जाणवल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन डॉ. काळे यांनी केले आहे. दरम्यान, जिल्हा आरोग्याधिकारी सतर्क झाले असून त्यांनी तालुका आरोग्याधिकारी डॉ.विक्रम काळे यांना रुग्णाची भारती हॉस्पिटलमध्ये जाऊन माहिती घेण्याची सुचना दिली आहे.

> नीरा परिसरात आढळलेल्या जीबीएस रुग्णाचा कोठे प्रवास झाला , कोठे काय खान्यात आले तसेच त्यांच्या परिसरातील पाण्याचे नमुने घेऊन सर्व्हेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच रुग्णाची सर्व इंतभूत माहिती घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
> **- डॉ. रामचंद्र हंकारे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. पुणे**

# दुचाकीला धडक देत तरुणाची निर्घृण हत्या

**जमिनीच्या वादातून थरार; दोन जण अटक**

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

भवरापूर (ता. हवेली) येथे जुन्या जमिनीच्या वादातून एका तरुणाची कारने जाणीवपूर्वक धडक देऊन हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना सोमवार (दि. २ मार्च) रोजी दुपारी पावणेचार च्या सुमारास घडली. या प्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात १)अक्षय दशरथ साठे (वय ३२ वर्ष) रा. भवरापूर,ता. हवेली,२) गोकुळ नाना कोकरे (वय २३ वर्ष) रा.आष्टापूर, ता.हवेली, जि. पुणे यांना अटक करण्यात आली आहे. अक्षय साठे याच्यावर यापूर्वीही लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

तक्रारदार लक्ष्मण सोपान साठे (वय ५८, व्यवसाय, शेती) रा. भवरापूर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, जमीन गट क्रमांक १०४ संदर्भातील जुना वाद तसेच सामाईक नदीवरील मोटार दुरुस्तीच्या कारणावरून आरोपींमध्ये वाद सुरू होता. या वादाचा राग मनात धरून आरोपी अक्षय साठे व त्याचा साथीदार गोकुळ कोकरे यांनी संगनमताने पूर्ववैमनस्यातून लक्ष्मण साठे यांचा मुलगा महेश लक्ष्मण साठे (वय ३२ वर्ष) याचा जीव घेतल्याचा आरोप केला आहे. सोमवर दि.२ मार्च रोजी सुमारे ३:४५ वाजता महेश साठे हे झालेल्या वादाची तक्रार देण्यासाठी उरुळी कांचन पोलीस स्टेशनला गेले होते. त्यावेळी पोलीसांनी




महेश साठे ला वैद्यकीय तपासणी साठी पाठवले. त्यावेळी आधार कार्ड नसल्याने ते आणण्यासाठी मोटरसायकल (क्र. MH12CJ9551) यावरून उरुळी कांचन ते भवरापूर मार्गे जात असताना, आरोपींनी त्यांच्या हुंडाई कंपनीची आय-ट्वेंटी (क्र. MH12QY7888) या कारने मागून जोरदार धडक दिली. ही धडक जाणीवपूर्वक देत खून केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेपूर्वी महेश साठे यांच्या पत्नीने दुपारी ०३:२० वाजता (११२) या पोलीस मदत क्रमांकावर फोन करून “आमच्या घरी लोक मारायला येणार आहेत,तसेच माझ्या पतीच्या जीवाला धोका आहे. आपण तातडीने या,” अशी माहिती दिली होती. त्यानंतर पो हवा दत्तात्रय गाडेकर व पो कॉ सुमित वाघ हे तात्काळ भवरापूरकडे रवाना झाले.

सुमारे ३:४५ वाजता साठे वस्ती येथे पोहोचल्यावर पोलिसांना दुचाकी व कारचा अपघात झाल्याचे आढळले. महेश साठे हे रस्त्याच्या कडेला गंभीर जखमी अवस्थेत पडलेले होते. पोलिसांनी तातडीने त्यांना उपचारासाठी रवाना केले. मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे समजते. घटनेनंतर कारमधील एक जण पळून गेला. तर कार चालक अक्षय साठे याला पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले. पुढील तपासादरम्यान पळुन गेलेला आरोपी गोकुळ कोकरे ला पोलीसांनी अटक केली आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असुन पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण कांबळे करीत आहेत. या घटनेमुळे भवरापूर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. जमिनीच्या वादातून थेट जीव घेण्यापर्यंत गेलेली ही घटना तालुक्यात खळबळ उडवणारी ठरली आहे.